**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

---

**विषय क्रमांक : ६३** **दिनांक :- २६/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील उद्यानामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अवलोकनार्थ बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर की,अहमदनगर महानगरपालिका ,अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारती समोरील उद्यानामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणेबाबत मा.महासभा व मा.स्थायी समिती या सभामध्ये वेळोवेळी विषय मंजुर झालेले आहेत.

दि.२४/६/२०२२ रोजीच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये अहमदनगर शहरातील शिवप्रेमींनी अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारती समोरील उद्यानामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणेबाबत आंदोलन केले होते.त्यासभेमध्ये मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,सभापती,स्थायी समिती यांनी पुढील सभेमध्ये पुतळा बसविणेच्या निविदेस मान्यता दिलेली आहे.त्यानुसार ऋषी आर्टस,श्री.नवीन ऋषी शेगमवार,पुणे यांना इकडील जा.क्र./ निविदा/१ दि.६/४/२०२२ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.कार्यारंभ आदेशान्वये ऋषी आर्टस,पुणे यांचे काम प्रगतीपथावर आहे.

मा.प्रधानसचिव ,नगरविकास विभाग ,मंत्रालय,मुंबई यांना इकडील सां.बां.जा.क्र.२८७६ दि.२५/२/२०२२ रोजी ना हरकत दाखला मिळणेबाबत पत्र दिलेले आहे.

तसेच मुख्य वास्तुशास्त्रज्ञ ,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना दि.११/७/२०१९ व २९/९/२०२१ रोजी पुतळा उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची विनंतीचे पत्र दिलेले आहे.अद्याप त्यांची परवानगी मिळालेली नाही.

त्याचप्रमाणे मा.पोलीस अधिक्षक,अहमदनगर यांना दि.११/७/२०१९,स्मरणपत्र दि.२९/११/२०१९ दि.१/७/२०२० दि.२०/१०/२०२१ ,दि.२९/१०/२०२१ ,दि.१०/१२/२०२१ व दि.११/४/२०२२ अन्वये वेळोवेळी पुतळा बसविणेस नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंतीचे पत्र दिले असता त्यांनी पुतळा उभारण्या संदर्भात मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करावा.त्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी पोलीस अधिक्षक ,अहमदनगर यांचा अहवाल मागितलेवर चौकशी अंती ना हरकत देणे बाबत कार्यवाही करण्यांत येईल असे इकडेस पत्र दिलेले आहे.

मा.जिल्हाधिकारी ,अहमदनगर यांना दि.२८/८/२०२० ,दि.१८/२/२०२१ व दि.११/६/२०२१ अन्वये श्रीमंत शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणेस मान्यता मिळणेस पत्र दिलेले आहेत.मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाने कळविलेल्या पुर्तते बाबत कार्यवाही सुरू आहे.व दि.५/७/२०२२ अन्वये व पुतळा उभारणे कामी पोलीस विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मा.जिल्हाधिकारी ,अहमदनगर यांचेमार्फत मागविणेस विनंती केलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारती समोरील उद्यानामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणेच्या ठिकाणी सुशोभिकरण करणे कामाची मा.श्री.कुमार बबनराव वाकळे ,सभापती ,स्थायी समिती व मा.आयुक्त यांचे समवेत पाहणी केलेली असुन सदर कामाचे अंदाजपत्रक व प्लॅन करणेचे काम सुरू आहे.

येणे प्रमाणे केलेली कार्यवाही मा.स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर करणेकामी आदेशार्थ सविनय येणे प्रमाणे मा.शहर अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,पाहिले,स्थायी कडे पाठविणेस मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**<u>चर्चा -</u>**

मा.सभापती साहेब :- विषयाचे वाचन करण्यात यावे.सदर विषयाबाबतची माहिती देण्यात यावी.

उप अभियंता श्री.पारखे :- नगर शहरातील शिवप्रेमींनी छत्रपती शिवाजी माहाराज व संभाजी महाराज यांचे पुतळे बसविणे कामी होत असलेली दिरंगाई पहाता दि.२४/०६/२०२२ रोजी मा.स्थायी समिती मध्ये अंदोलन केले होते.मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १९५ दि.१०/०३/२०२२ रोजी छत्रपती पुतळा बसविणे कामी मान्यता दिलेली आहे.त्यानुसार शेगमवार यांना दि.०६/०४/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश दिलेला आहे.दि.११/०७/२०१९ ,१०/१२/२०२१ रोजी मा.पोलीस अधिक्षक यांना पुतळे बसविणेकामी ना- हरकत मिळणेकामी पत्र दिलेले आहे.

मा.श्री.सचिन शिंदे :- पुतळा बसविणेबाबत उशिर का होत आहे.

उप अभियंता श्री.पारखे :- पुतळयांचे क्ले मॉडेल तयार झालेले आहे.पुतळा बसविणे कामी मान्यता घेण्याची कार्यवाही चालू आहे.

मा.सभापती साहेब :- टेंडरची मुदत किती दिली .मुदतीचा कालावधी संपुण गेला असेल.

उपअभियंता श्री.पारखे :- पुढच्या आठवडयापर्यत कला संचानलयाची मंजूरी येईल.

मा.सभापती साहेब :- छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्याच्या जागेभोवती सुशोभिकरण करणे आवश्यक आहे.पुतळा बसविण्यास मंजुरी मिळाल्यानंतर सुशोभिकरणाचे काम कधी करणार.मा.जिल्हाधिकारी पोलीस अधिक्षक यांना आपण स्वत: भेटुन सांगु.

उप अभियंता श्री.पारखे :- मा.जिल्हाधिकारी कार्यालय तसेच पोलीस अधिक्षक कार्यालय यांना वेळोवेळी पत्र देवून परवानगीमिळणे बाबत विनंती केलेली आहे.तसेच समक्ष भेट घेतलेली आहे.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिका पॅनेल वरील ॲड.काळे,ॲड.जोशी ,ॲड.गांगर्डे यांचे बरोबर पुतळा बसविणे कामी चर्चा केली का?

उप अभियंता श्री.पारखे :- पॅनल वरील वकिलांना चर्चे कामी बोलविले होते.त्यांच्याशी चर्चा झालेली आहे.

ॲड.श्री.काळे, मनपा पॅनल :- छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणेकामी लागणा-या परवानग्या घेणे कामी कायदेशीर काय अडचणी आहेत या बाबत माहिती दिली नाही.क्ले मॉडेल बाबत कला संचालनालय यांचे मंजूरी करीता पत्रव्यवहार झालेला नाही.वास्तु विशारद यांना पत्र दिले त्याची पोहोच नाही.

मा.श्री.परसराम गायकवाड :- छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणे बाबतचा विषय अनेक वर्षापासुन प्रलंबित असुन प्रशासनाकडून त्यावर योग्य ती कार्यवाही होतांना दिसुन येत नाही.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- चिफ आर्किटेक व कला संचालनालय यांना मी स्वत: पुतळया संदर्भात फोन केलेले आहेत.आणि समक्ष जावून आलेलो आहे.तसेच जिल्हा स्तरीय समितीस भेटललेलो आहे.मा.जिल्हाधिकारी यांनी पुतळयासंदर्भात मिटींग घेतली नाही.

मा.सभापती साहेब :- पुतळे बसविणे संदर्भात कमीटी बरोबर पत्र व्यवहार झालेला आहे का?

उपअभियंता श्री.पारखे :- छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणे जिल्हाधिकार्यालय व पोलीस अधिक्षक कार्यालय यांचे बरोबर वेळोवेळी पत्र व्यवहार झालेला आहे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- पोलीस अधिक्षक व मा.जिल्हाधिकारी साहेब यांना प्रत्यक्ष भेटून काम करावे लागेल.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- पुतळा बसविणे परवानगी मिळणे बाबत वारंवार दोन्ही कार्यालयांना पत्रव्यवहार करावा.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- मा.स्थायी समिती सदस्य हे जिल्हाधिकारी साहेब व पोलीस अधिक्षक साहेबांना समक्ष भेटलेतर कामाला गती येईल.पुतळा बसविणे कामी जिल्हास्तरीची तात्पुरती मंजुरी घेणे आवश्यक आहे.त्यानंतरच कला संचालनालयाची मंजुरी घेता येईल.सर्वानी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

मा.सभापती साहेब :- पुतळा बसविणेकामी जागा आपल्या मालकीची आहे.जागेला कंम्पौड वॉल आहे.काही अडचण नसतांना परवानगी का मिळत नाही.सहा वर्षापुर्वी ठराव केला होता.त्याची मुदत संपलीतर पुन्हा ठराव करावा लागेल.वारंवार कमिटीला पत्र दया.एकदा पत्र देवून काम होणार नाही.

ॲड.श्री.काळे :- पुतळा बसविणे कामी ज्यांच्या परवानग्या घ्यावयाच्या आहेत.ते सर्व वरिष्ठ अधिकारी आहेत.त्यांना पत्र देवून समक्ष भेटून विनंती करावी लागेल.जिल्हा स्तरीय समितीची परवानगी / ना-हरकत घेतल्या शिवाय पस्ताव पाठविता येणार नाही.त्यांच्या परवानगी नंतरच पुढील काम करता येईल.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- परवानगी देणारे वरिष्ठ अधिकारी असल्याने प्रशासन त्यांना जाब विचारू शकत नाही.मा.स्थायी समितीने विचारणे योग्य होईल.

मा.सभापती साहेब :- परवानगी घेण्याची व समिती सदस्यांना भेटण्याची फक्त मा.स्थायी समिती सदस्यांची जबाबदारी नाही.त्यात प्रशासनानेही कार्यवाही करणे आवश्यक आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा तयार होवून आल्यानंतर बसविण्यास जागेचे सुशोभिकरण झाले नाही तर सभागृहामध्ये पुतळा बसविण्यास काय अडचण आहे.

मनपा पॅनल वरील ॲड.श्री.काळे :- शासकिय कार्यालयामध्ये मा.शासनाच्या आदेशानुसार फक्त मा.राष्ट्रपती,मा.पंतप्रधान यांचे फोटो लावण्यास परवानगी आहे.शासकिय कार्यालय असल्याने त्या ठिकाणी पुतळा ठेवता येणार नाही.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- जिल्हास्तरीय समिती बैठकीमध्ये चर्चा होवून ना- हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.त्यानुसार पुढील कार्यवाही करता येईल.जिल्हास्तरीय समितीच्या परवानगी नंतर कला संचानलायाची मंजुरी घेता येईल.मा.जिल्हाधिकारी साहेब यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आपल्याला आपल्या जागेमध्ये बसवावयाचा आहे.आपण बसवुन टाकू.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- आपल्याला तसे करता येणार नाही.कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होते.मंजुरी घेणे आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- मा.शासन दरबारी म्हणणे योग्य रितीने मांडता येत नाही.चौथरा सुशोभिकरणाला परवानगी लागेल.महानगरपालिका काम करू शकते.बांधकाम विभागामर्फत सुशोभिकरणाचे काम सुरू करा पुतळयास सल्लग्न असे सुशोभिकरण करण्याचा प्रस्ताव ठेवा.सुशोभिकरण करण्याचे काम करण्यास वेळ लागणार आहे.त्यासाठी आपल्या विभागाच्या परवानग्या घेवून काम सुरू करा.

मुख्यलेखापरिक्षक श्री.पवार :- २ मे २०१७ च्या परिपत्रकानुसार प्रस्ताव दयावा लागेल.सदर प्रस्तावाची छाननी करून मा.जिल्हाधिकारी साहेब यांना पाठवावी लागेल.

मा.सभापती साहेब :- छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणे कामी नियुक्त केलेल्या कमिटीची मिटींग लावा.नंतर प्रशासनाची व पदाधिका-यांची मिटींग घेवू.समितीच्या मिटींग नुसार मा.जिल्हाधिक्षक व मा.जिल्हाधिकारी यांची वेळ घेवून त्यांची भेट घेवू. महानगरपालिकेची बाजु चांगली मांडावी लागेल.परवानगी संदर्भात काही अपुर्ण कागदपत्रे असतील तर ती पुर्ण करा.सुशोभीकरणाचे काम इमारत सुशोभिकरण म्हणून करून घ्यावे पुतळा तयार होवून आल्यानंतर लगेच बसविता येईल.छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा तयार आहे.त्याची रक्कम अदा केली आहे.फक्त जागा नाही.पुतळा बसविणे कामी विकास आराखडा तयार करण्यात यावा.

मा.श्री.गणेश कवडे :- सात दिवसांमध्ये वरील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील उद्यानामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अवलोकन झाली आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील उद्यानामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अवलोकन झाले आहे.दिनांक २६/०२/२०१८ रोजीच्या मा.महासभेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा महानगरपालकेच्या प्रांगणामध्ये बसविणे बाबत त्यावेळी मी नगरसेवक असतांना प्रस्ताव मांडला होता.तत्कालीन महापौर यांनी त्यास मंजुरी देखील दिली होती. सदर ठराव होवून सहा वर्ष झालेली आहेत.शिवप्रेमींच्या भावना लक्षात घेवून प्रशासने लवकरात लवकर पुढील कार्यवाही करावी.

सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार बांधकाम विभागामार्फत अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकिय इमारती समोरील उद्यानामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणे करीता चौथरा परिसर सुशोभीकरणाचे काम "इमारत दुरूस्ती" या लेखाशिर्षा अंतर्गत पुतळयास सल्लग्न असे सुशोभिकरण करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणे कामी नियुक्त केलेल्या कमिटीची मिटींग बोलविण्यात यावी.त्यानंतर ,प्रशासन व पदाधिका-यांची मिटींग घेण्यात यावी व मा.जिल्हाधिकारी व मा.जिल्हा पोलीस अधिक्षक, यांची वेळ घेवून त्यांची समक्ष भेटीचे नियोजन करण्यात यावे.परवानगी संदर्भात काही अपुर्ण कागदपत्रे असतील तर तात्काळ पुर्ण करा.पुतळा तयार होवून आल्यानंतर लगेच बसविता येईल असे नियोजन करण्यात यावे.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

**विषय क्रमांक : ६४** **दिनांक :- २६/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग, मा.शासन निर्णय/ परि पत्रकान्वये १.श्री अनिल सुरेश साठे,सफाई कामगार व २.श्री.रुपेश आनंद सोहत्रे, सफाई कामगार यांना लाड-पागे कमिटीच्या वारसा हक्काच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीस कार्योत्तर मजुरी मिळणे बाबत.ऑफीस रिपोर्ट.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती. नंदा आनंद क्षोहत्रे ह्या अहमदनगर महानगरपालिकेत दि.११/०७/२००१ पासुन "सफ़ाई कामगार" या पदावर कायम कर्मचारी म्हणुन कार्यरत होत्या, त्या दि.०४/०१/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांनी दि.१४/०१/२०२२ रोजी अर्ज देऊन " त्यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री. रुपेश आनंद सोहत्रे यांना लाड-पागे-समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी "अशी विनंती केलेली आहे.

तसेच त्यांचा मुलगा श्री. रुपेश आनंद सोहत्रे यांनी दि.१९/०१/२०२२ रोजी अर्ज देऊन "आईच्या जागेवर लाड पागे-समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी"अशी विनंती करुन सोबत खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत.

१.सेवानिवृत्त कर्मचा-याचा मुलास नोकरी देण्याचे व क्षोहत्रे / सोहत्रे या दोन्ही अडनावाची व्यक्ती एकच असलेचे प्रतिज्ञापत्र.( मुळ प्रत)२.कुटुंबातील इतर व्यक्तींचे त्यांना नोकरी देण्याचे संमतीपत्र.(मुळ प्रत)३.कुटुंबात वडील एमआयआरसी येथे आर्मी मध्ये नोकरी असुन इतर कोणीही शासकीय/निमशासकीय नोकरीला नसल्याचे प्रतिज्ञापत्र. (मुळ प्रत)४.कुटुंबाचे पालन पोषन करणेचे प्रतिज्ञापत्र. (मुळ प्रत)५.लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र. (मुळ प्रत)६.एकत्रीत कुटुंबात रहात असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र. (मुळ प्रत)७.सेवा योजन कार्यालयाकडे नोंद केलेची स्लीप.(साक्षाकींत प्रत)८.शाळा सोडल्याचा दाखला (साक्षाकींत प्रत)९.जातीचा दाखला. (साक्षाकींत प्रत)१०शिधापत्रिका.(साक्षाकींत प्रत)११.आधारकार्ड (साक्षाकींत प्रत)१२. ई. १० वी व १२ वी उत्तीर्णचे गुणपत्रक.( स्वसाक्षाकींत प्रत) १३.श्रीमती. नंदा आनंद क्षोहत्रे, सफ़ाई कामगार यांचा सेवानिवृत्ती आदेश.( स्वसाक्षाकींत प्रत)

इत्यादी उपरोक्त नमुदनुसार अपुर्ण कागदपत्र सादर केलेली असल्याने त्यांना जा.क्र.आस्था.२५० दिनांक २४/०१/२०२२ अन्वये पुर्ण कागदपत्र सादर करण्यास कळविण्यात आले असता, त्यांनी दिनांक २७/०१/२०२२ रोजी खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत.

१.जन्म घरी झालेला असल्याने शाळा सोडल्याच्या दाखल्यावरील जन्म दिनांक ग्राह्य धरण्याचे प्रतिज्ञापत्र / स्वयंघोषणापत्र.( मुळ प्रत)२.श्रीमती.नंदा सोहत्रे,स्वे.से.नि.स.का यांचा शाळा सोडल्याचा व जातीचा दाखला(स्वसाक्षाकींत प्रत) ३.मतदार ओळखपत्र ( स्वसाक्षाकींत प्रत)४.श्रीमती. नंदा आनंद सोहत्रे, स्वे.से. नि. सफ़ाई कामगार यांच्या सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत, नेमणुक कायम आदेश, शाळा सोडल्याचा व नामनिर्देशन फ़ॉर्म (स्वसाक्षाकींत प्रत)

उपरोक्त नमुद आवश्यक असलेली कागदपत्र सादर केलेली आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील नमुद मा.शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोंबर,२०११, दिनांक २६ फ़ेब्रुवारी,२०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च,२०१६ मधील प्रमुख तरतुदीची पुर्तता केलेची दिसुन येत आहे.

| अ.क्र | प्रमुख तरतुदी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| अ) | सफ़ाई कामगारांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर,स्वेच्छा निवृत्तीनंतर, किंवा शासन सेवापुर्ण करण्यास वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी.व वारसा हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात याव्यात.१) पती/ पत्नी २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४) विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी ५) विधवा / घटस्फ़ोटीत बहीण.६) वरीलपैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफ़ाई कामगांराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती. | श्रीमती. नंदा आनंद क्षोहत्रे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचे श्री. रुपेश आनंद सोहत्रे हे त्यांचे मुलगा असुन सदर शासन तरतुदीनुसार **" मुलगा "** हा वारस हक्कास पात्र व्यक्ती आहेत. |
| (ब) | सफ़ाई कर्मचा-याच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत असल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येनार नाही. | कुटुंबात वडील श्री. आनंद किशोर सोहत्रे हे एमआयआरसी येथील आर्मीमध्ये नोकरीस असुन इतर कोणीही शासकीय/ निमशासकीय सेवेत नसल्याचे क्र. झेड के ३५०७८५ दि.१३/०१/२०२२ रोजीचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| क) | वारसा हक्कास पात्र असणा-या व्यक्तीपैकी कोणाही एकास निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/ वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगारांच्या/कर्मचा-याच्या शिफ़ारशीनुसार नोकरी हक्क द्यावा.मात्र मृतकामगाराच्या / कर्मचा-याच्या बाबतीत वरील (अ) मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी एकास नोकरीस घ्यावे. | श्रीमती. नंदा आनंद क्षोहत्रे, सफ़ाई कामगार ह्या दि. ०४/०१/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असुन त्यांनी दि. १४/०१/२०२२ रोजीच्या विनंती अर्जानुसार संमतीपत्र व स्वयंघोषणापत्र. क्र. झेड के. ३५०७८८ दि.१३/०१/२०२२ अन्वये मुलगा श्री. रुपेश आनंद सोहत्रे यांना नोकरी देण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| ड ) | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे. | एकत्रित कुटुंबात रहात असले बाबतचा पुरावा म्हणुन प्रतिज्ञापत्र / स्वयंघोषणापत्र क्र. झेड के ३५०७८६ दि.१३/०१/२०२२अन्वये व शिधापत्रिका अ. क्र. डब्ल्यु. जी.०३३७७२६ची स्वसाक्षांकीत प्रत सादर केलेले आहे. |
| उ) | सफ़ाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या मुदतीत सफ़ाई कर्मचा-याच्या पात्र कुंटुबियाकडुन नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिका-याकडे वारसाहक्काने नियुक्ती मिळण्याकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील | श्रीमती. नंदा आनंद क्षोहत्रे, सफ़ाई कामगार ह्या दि. ०४/०१/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे जागेवर त्यांचा मुलगा श्री. रुपेश आनंद सोहत्रे यांनी दि. १९/०१/२०२२ रोजी एक वर्षाच्या मुदतीत वारसा हक्काने नोकरी मिळणेचा आर्ज सादर केलेला आहे. |
| ३) | सफ़ाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसुचीत जातीमधील इतर सफ़ाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | श्रीमती. नंदा आनंद क्षोहत्रे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांनी सादर केलेला जातीचा दाखला व मुलगा श्रीमती. रुपेश आनंद सोहत्रे यांनी सादर केलेला जातीचा दाखला पहाता ते हिंदु-मेहतर या जातीचे असुन ते अनुसुचीत जाती प्रवर्गातील आहेत. |
| ४) | सदरहु निर्णय राज्यातील सर्व विभागातील सफ़ाई कामगारांच्या वारसांना लागु राहतील. | श्रीमती. नंदा आनंद क्षोहत्रे ह्या अहमदनगर महानगरपालिकेत सफ़ाई कामगार या पदावर कार्यरत असतांना स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या वारसास सदर तरतुदी लागु होतात. |

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका सर्व साधारण सभेने प्रस्ताव क्र.६ दि.२०-११-२००४ अन्वये "भविष्यात बर्वे, लाड व मलकानी समितीच्या शिफ़ारशीनुसार व वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरणा-या वारसांना प्रशासकीय पातळीवर छाणनी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देणेस मंजुरी देण्यांत येत आहे." असा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे.

तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनेनुसार "शासन सेवेतील गट अ ते ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान कुटूंबाची अतिरिक्त अट लागु करणे बाबत सुचित केलेले आहे व प्रतिज्ञापन नमुना अ नुसार सर्व उमेदवारांकडुन प्रतिज्ञापत्र घेणे बाबत निर्देश दिलेले आहे." तथापी श्री. रुपेश आनंद सोहत्रे यांनी लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापन क्र.झेड के. ३५०७८७ दिनांक १३/०१/२०२२ रोजीचे सादर केलेले आहे.

त्याचबरोबर शासन निर्णय वित्त विभाग दि.३१ आक्टोंबर २००५ च्या आदेशाने "राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेबंर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत कळविले आहे व अशा उमेदवारांना त्यांची सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल.

मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही." असे कळविणे बाबत आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टीआरएम-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ दिनांक २३ संप्टेंबर,२०११ नुसार नियुक्ती दिनाकांपासुन सहा महिण्यात पायाभुत प्रशिक्षण अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मार्फ़त पुर्ण करणे अनिवार्य करण्यात आलेले असुन. सदरचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतरच परिविक्षाधिन कालावधी समाप्त करण्यात येईल, ही अट नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तथापी सदरचे प्रशिक्षण ६ महिण्याचे मुदतीत होत नसल्याने भविष्यात सदर प्रशिक्षणास नियुक्ती झाल्यास प्रशिक्षणास जाणेस बंधनकारक राहील.याअटीवर नियुक्ती करणे उचित होईल.

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका मा. सभेने ठराव क्र.५२ दिनांक १६/०३/२०१६ अन्वये "सफ़ाई व मेहतर कामगारांना नियुक्ती देताना एकत्रीत वेतनाऐवजी नियमित वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच सफ़ाई व मेहतर कामगारांना नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती देताना मा. शासन निर्णयानुसार परिविक्षाधिन कालावधी हा २ वर्षाचा नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तसेच वर्ग ४ मधील सफ़ाई/मेहतर कामगारापदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे-१३००अशी आहे.

तसेच शासन दिनांक ६ फ़ेब्रुवारी,२०१६ ची अधिसुचना अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम,२०१६ ) परिशिष्ट २ अ. क्र.९३ मध्ये नामनिर्देश/ लाडपागे समितीच्या शिफ़ारशीनुसार सफ़ाई कामगारांच्या नेमणुकीकरिता अर्हता (अ) ई. ४ थी उत्तीर्ण (ब) मराठी लिहीता वाचता, बोलता येणे आवश्यक आहे" असे नमुद केलेले आहे.

मा. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि. २८ ऑगस्ट,२०१७ नुसार शासन सेवेत नेमणुक करताना उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना घेऊन जा. क्र. आस्था.३७३ दि.०३/०२/२०२२ अन्वये मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडुन उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य यांची माहिती मागविण्यात आली असता, त्यांनी जा. क्र. जिविशा /चा.पडताळणी/२०/२०२२ दि. ०७/०२/२०२२ अन्वये " श्री. रुपेश आनंद सोहत्रे यांची चारित्र्य पडताळणी करण्यात आलेली असुन , त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन रेकॉर्डला गुन्हा, दंड अगर शिक्षा झाले बाबत नोंद आढळुन आलेली नाही" असे इकडेस कळविलेले आहे.

मा. शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक सफ़ाई-२०२१/ प्र. क्र. १३७/ नवि-६ दिनांक १० डिसेंबर, २०२१ चे परिपत्रकान्वये" महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील सफ़ाई कर्मचा-यांच्या

वारसांना वारसा हक्काने नियुक्त्या विहीत (३० दिवसांच्या आत) कालावधीत नियुक्त्या देण्याबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

" सफ़ाई कर्मचा-यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्तीबाबतच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत असल्यास, संबधित मुख्याधिकारी / आयुक्त यांनी संबधीत वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ, याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या, नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतीत स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवाव्या."

सेवानिवृत्त कर्मचारी श्रीमती. नंदा आनंद सोहत्रे, सफ़ाई कामगार यांचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व हुद्दा** | **जन्म दिनांक** | **शैक्षणिक पात्रता** | **नेमणुक दिनांक** | **सेवानिवृत्त दि. व एकुण सेवा** | **जात प्र-वर्ग** |
|---|---|---|---|---|---|
| श्रीमती. नंदा आनंद क्षोहत्रे, सफ़ाई कामगार | ०१/०४/१९७७ | इ.३ री | ११/०७/२००१ | ०४/०१/२०२२ स्वेच्छा से. नि. २० वर्ष ५ महिने | हिंदु-वाल्मिकी (अनु.जाती.) |

वारसाचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **अर्जदाराचे नांव व नाते** | **शैक्षणिक पात्रता** | **जन्म दिनांक** | **जात प्र-वर्ग** | **द्यावयाचे पदाचे नांव** | **सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन ब्रॅण्ड** |
|---|---|---|---|---|---|
| श्री. रुपेश आनंद सोहत्रे, मुलगा | ई. १२ वी पास | २०/०६/१९९४ वय- २५ वर्षे (शाळा सोडल्याचा दाखल्यावरुन ) | हिंदु-मेहतर (अनु.जाती ) | सफ़ाई कामगार | ४४४०-७४४० यामध्ये वेतन ४४४० अधिक ग्रेड पे र १३००/- |

तरी, उपरोक्त नमुदनुसार तसेच शासन निर्णयाच्या अटीनुसार, लाड कमिटीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने, मा. महानगरपालिका ठरावानुसार अहमदनगर महानगरपालिकेतील श्रीमती. नंदा आनंद क्षोहत्रे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री. रुपेश आनंद सोहत्रे यांना " सफ़ाई कामगार " या पदावर ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे- १३०० या मध्ये मुळवेतन र ४४४०/- अधिक ग्रेड पे १३०० अधिक नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नियुक्ती आदेश देण्यास व सदर नियुक्तीस कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. सुरेश पौलस साठे हे अहमदनगर महानगरपालिकेत दि. ०६/११/१९९३ पासुन "सफ़ाई कामगार" या पदावर कायम कर्मचारी म्हणुन कार्यरत होते. ते दि. १९/०१/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांनी दि. ०१/०२/२०२२ रोजी अर्ज देऊन " त्यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री. अनिल सुरेश साठे यांना लाड-पागे-समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी "अशी विनंती केलेली आहे.

तसेच त्यांचा मुलगा श्री. अनिल सुरेश साठे यांनी दि.०१/०२/२०२२ रोजी अर्ज देऊन "आईच्या जागेवर लाड पागे-समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी"अशी विनंती करुन सोबत खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत.

१)कुटुंबातील इतर व्यक्तींचे त्यांना नोकरी देण्याचे स्वयंघोषणापत्र.(मुळ प्रत)२) कुटुंबाचे पालन पोषन करणेचे स्वयंघोषणापत्र. (मुळ प्रत)३)लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र. (मुळ प्रत)४) शाळा सोडल्याचा दाखला (स्वसाक्षाकींत

प्रत)५.जन्म प्रमाणपत्र ( ऑनलाईन प्रत) ६.जातीचा दाखला. (स्वसाक्षाकींत प्रत)७.शिधापत्रिका.(स्वसाक्षाकींत प्रत)८.सेवा योजन कार्यालयाकडे नोंद केलेची स्लीप.(स्वसाक्षाकींत प्रत)९.आधारकार्ड (स्वसाक्षाकींत प्रत)१०..मतदार ओळखपत्र.( स्वसाक्षाकींत प्रत) ११.कुटुंबात कोणीही शासकीय/निमशासकीय नोकरीला नसल्याचे स्वयंघोषणापत्र (मुळ प्रत)१२.एज ॲण्ड डोमॅसाईल सर्टीफिकेट.( ऑनलाईन प्रत) १३.एकत्रीत कुटुंबात रहात असलेबाबतचे स्वयंघोषणापत्र. (मुळ प्रत)१४.से.नि. सफ़ाई कामगार श्री. सुरेश पौलस साठे यांचा नेमणुक व सेवानिवृत्ती आदेश. ( छायाकींत प्रत)१५.सेवानिवृत्त कर्मचा-याचा मुलास नोकरी देण्याचे स्वयंघोषणापत्र.( मुळ प्रत)१६.से.नि. सफ़ाई कामगार श्री. सुरेश पौलस साठे यांचा जातीचा दाखला व सेवा पुस्तकाच्या पहिल्यापानाची प्रत ( छायाकींत प्रत)

उपरोक्त नमुद आवश्यक असलेली कागदपत्र सादर केलेली आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील नमुद मा.शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोंबर,२०११, दिनांक २६ फ़ेब्रुवारी,२०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च,२०१६ मधील प्रमुख तरतुदीची पुर्तता केलेची दिसुन येत आहे.

| अ.क्र | प्रमुख तरतुदी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| अ) | सफ़ाई कामगारांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर,स्वेच्छा निवृत्तीनंतर, किंवा शासन सेवापुर्ण करण्यास वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी.व वारसा हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात याव्यात.१) पती/ पत्नी २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४) विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी ५) विधवा / घटस्फ़ोटीत बहीण.६) वरीलपैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफ़ाई कामगांराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती. | श्री. सुरेश पौलस साठे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचे श्री. अनिल सुरेश साठे हे त्यांचे मुलगा असुन सदर शासन तरतुदीनुसार **" मुलगा "** हा वारस हक्कास पात्र व्यक्ती आहेत. |
| (ब) | सफ़ाई कर्मचा-याच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत असल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येनार नाही. | कुटुंबात कोणीही शासकीय/ निमशासकीय सेवेत नसल्याचे क्र. झेड एन ४७८५९७ दि.३१/०१/२०२२ रोजीचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| क) | वारसा हक्कास पात्र असणा-या व्यक्तीपैकी कोणाही एकास निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/ वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगारांच्या/कर्मचा-याच्या शिफ़ारशीनुसार नोकरी हक्क द्यावा.मात्र मृतकामगाराच्या / कर्मचा-याच्या बाबतीत वरील (अ) मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी एकास नोकरीस घ्यावे. | श्री. सुरेश पौलस साठे, सफ़ाई कामगार हे दि. १९/०१/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असुन त्यांनी दिनांक ०१/०२/२०२२ रोजीच्या विनंती अर्जानुसार संमतीपत्र व स्वयंघोषणापत्र. क्र. झेड.एन. ४७८६०९ दि. ३१/०१/२०२२ अन्वये मुलगा श्री. अनिल सुरेश साठे यांना नोकरी देण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| ड ) | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे. | एकत्रित कुटुंबात रहात असले बाबतचा पुरावा म्हणुन प्रतिज्ञापत्र / स्वयंघोषणापत्र क्र. झेड एन ४७८६९२ दि.०१/०२/२०२२अन्वये व शिधापत्रिका अ. क्र. एस. जे. ४९०९४ ची स्वसाक्षाकींत प्रत सादर केलेले आहे. |
| उ) | सफ़ाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या मुदतीत सफ़ाई कर्मचा-याच्या पात्र कुंटुबियाकडुन नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिका-याकडे वारसाहक्काने नियुक्ती मिळण्याकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील | श्री. सुरेश पौलस साठे, सफ़ाई कामगार हे दिनांक १९/०१/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे जागेवर त्यांचा मुलगा श्री. अनिल सुरेश साठे यांनी दि. ०१/०२/२०२२ रोजी एक वर्षाच्या मुदतीत वारसा हक्काने नोकरी मिळणेचा आर्ज सादर केलेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३) | सफ़ाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसुचीत जातीमधील इतर सफ़ाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | श्री. सुरेश पौलस साठे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांनी सादर केलेला जातीचा दाखला व मुलगा श्री. अनिल सुरेश साठे यांनी सादर केलेला जातीचा दाखला पहाता ते मांग या जातीचे असुन ते अनुसुचीत जाती प्रवर्गातील आहेत. |
| ४) | सदरहु निर्णय राज्यातील सर्व विभागातील सफ़ाई कामगारांच्या वारसांना लागु राहतील. | श्री. सुरेश पौलस साठे हे अहमदनगर महानगरपालिकेत सफ़ाई कामगार या पदावर कार्यरत असतांना स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या वारसास सदर तरतुदी लागु होतात. |

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका सर्व साधारण सभेने प्रस्ताव क्र.६ दि.२०-११-२००४ अन्वये "भविष्यात बर्वे, लाड व मलकानी समितीच्या शिफ़ारशीनुसार व वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरणा-या वारसांना प्रशासकीय पातळीवर छाणनी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देणेस मंजुरी देण्यांत येत आहे." असा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे.

तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनेनुसार "शासन सेवेतील गट अ ते ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान कुटूंबाची अतिरिक्त अट लागु करणे बाबत सुचित केलेले आहे व प्रतिज्ञापन नमुना अ नुसार सर्व उमेदवारांकडुन प्रतिज्ञापत्र घेणे बाबत निर्देश दिलेले आहे." तथापी श्री. अनिल सुरेश साठे यांनी लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापन क्र.झेड एन ४७८५९६ दिनांक ३१/०१/२०२२ रोजीचे सादर केलेले आहे.

त्याचबरोबर शासन निर्णय वित्त विभाग दि.३१ आक्टोंबर २००५ च्या आदेशाने "राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत कळविले आहे व अशा उमेदवारांना त्यांची सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल.

मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही." असे कळविणे बाबत आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टीआरएम-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ दिनांक २३ संप्टेंबर,२०११ नुसार नियुक्ती दिनाकांपासुन सहा महिण्यात पायाभुत प्रशिक्षण अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मार्फ़त पुर्ण करणे अनिवार्य करण्यात आलेले असुन. सदरचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतरच परिविक्षाधिन कालावधी समाप्त करण्यात येईल, ही अट नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तथापी सदरचे प्रशिक्षण ६ महिण्याचे मुदतीत होत नसल्याने भविष्यात सदर प्रशिक्षणास नियुक्ती झाल्यास प्रशिक्षणास जाणेस बंधनकारक राहील.याअटीवर नियुक्ती करणे उचित होईल.

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका मा. सभेने ठराव क्र.५२ दिनांक १६/०३/२०१६ अन्वये "सफ़ाई व मेहतर कामगारांना नियुक्ती देताना एकत्रीत वेतनाऐवजी नियमित वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच सफ़ाई व मेहतर कामगारांना नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती देताना मा. शासन निर्णयानुसार परिविक्षाधिन कालावधी हा २ वर्षाचा नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तसेच वर्ग ४ मधील सफ़ाई/मेहतर कामगारापदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे-१३००अशी आहे.

तसेच शासन दिनांक ६ फ़ेब्रुवारी,२०१६ ची अधिसुचना अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम,२०१६ ) परिशिष्ट २ अ. क्र.९३ मध्ये नामनिर्देश/ लाडपागे समितीच्या शिफ़ारशीनुसार सफ़ाई कामगारांच्या नेमणुकीकरिता अर्हता (अ) ई. ४ थी उत्तीर्ण (ब) मराठी लिहीता वाचता, बोलता येणे आवश्यक आहे" असे नमुद केलेले आहे.

मा. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि. २८ ऑगस्ट,२०१७ नुसार शासन सेवेत नेमणुक करताना उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना घेऊन जा. क्र. आस्था.३८७ दि.०४/०२/२०२२ अन्वये मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडुन उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य यांची माहिती मागविण्यात आली असता, त्यांनी जा. क्र. जिविशा /चा.पडताळणी/२१/२०२२ दि. ०७/०२/२०२२ अन्वये " श्री. अनिल सुरेश साठे यांची चारित्र्य पडताळणी करण्यात आलेली असुन, त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन रेकॉर्डला गुन्हा, दंड अगर शिक्षा झाले बाबत नोंद आढळुन आलेली नाही" असे इकडेस कळविलेले आहे.

मा. शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक सफ़ाई-२०२१/ प्र. क्र. १३७/ नवि-६ दिनांक १० डिसेंबर, २०२१ चे परिपत्रकान्वये" महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील सफ़ाई कर्मचा-यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्त्या विहीत (३० दिवसांच्या आत) कालावधीत नियुक्त्या देण्याबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

" सफ़ाई कर्मचा-यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्तीबाबतच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत असल्यास, संबधित मुख्याधिकारी / आयुक्त यांनी संबधीत वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ, याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या, नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतीत स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवाव्या."

सेवानिवृत्त कर्मचारी श्री. सुरेश पौलस साठे, सफ़ाई कामगार यांचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व हुद्दा** | **जन्म दिनांक** | **शैक्षणिक पात्रता** | **नेमणुक दिनांक** | **सेवानिवृत्त दि. व एकुण सेवा** | **जात प्र-वर्ग** |
|---|---|---|---|---|---|
| श्री. सुरेश पौलस साठे, सफ़ाई कामगार | १५/८/१९६४ | इ. ९ वी पास | ०६/११/१९९३ | १९/०१/२०२२ स्वेच्छा से. नि. २८ वर्ष | मांग (अनु.जाती.) |

वारसाचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **अर्जदाराचे नांव व नाते** | **शैक्षणिक पात्रता** | **जन्म दिनांक** | **जात प्र-वर्ग** | **द्यावयाचे पदाचे नांव** | **सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन ब्रॅण्ड** |
|---|---|---|---|---|---|
| श्री. अनिल सुरेश साठे, मुलगा | ई. ९ वी | ०८/०४/१९९० वय- ३२ वर्षे (जन्म प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखल्यावरुन ) | हिंदु-मांग (अनु.जाती ) | सफ़ाई कामगार | ४४४०-७४४० यामध्ये वेतन ४४४० अधिक ग्रेड पे र १३००/- |

तरी, उपरोक्त नमुदनुसार तसेच शासन निर्णयाच्या अटीनुसार, लाड कमिटीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने, मा. महानगरपालिका ठरावानुसार अहमदनगर महानगरपालिकेतीलश्री. सुरेश पौलस साठे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री. अनिल सुरेश साठे यांना " सफ़ाई कामगार " या पदावर ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे- १३०० या मध्ये मुळवेतन र ४४४०/- अधिक ग्रेड पे १३०० अधिक नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नियुक्ती आदेश देण्यास व सदर नियुक्तीस कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार कार्यवाही करणेस मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुकत साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग, मा.शासन निर्णय/ परि पत्रकान्वये १.श्री अनिल सुरेश साठे,सफाई कामगार व २.श्री.रुपेश आनंद सोहत्रे, सफाई कामगार यांना लाड-पागे कमिटीच्या वारसा हक्काच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीस कार्यात्तर मजुरी मिळणे बाबत.ऑफीस रिपोर्ट.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग, मा.शासन निर्णय/ परि पत्रकान्वये १.श्री अनिल सुरेश साठे,सफाई कामगार व २.श्री.रुपेश आनंद सोहत्रे, सफाई कामगार यांना लाड-पागे कमिटीच्या वारसा हक्काच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या केलेल्या नियुक्तीस कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग, मा.शासन निर्णय/ परि पत्रकान्वये १.श्री अनिल सुरेश साठे,सफाई कामगार व २.श्री.रुपेश आनंद सोहत्रे, सफाई कामगार यांना लाड-पागे कमिटीच्या वारसा हक्काच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या केलेल्या नियुक्तीस कार्यात्तर मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

---

**विषय क्रमांक : ६५** **दिनांक :- २६/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने अहमदनगर महानगरपालिकेत श्रीमती कवीता सुनिल लोखंडे स.का.यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री.प्रविण सुनिल लोखंडे यांना सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती. कविता सुनिल लोखंडे ह्या अहमदनगर महानगरपालिकेत दि.२२/०८/१९९७ पासुन "सफ़ाई कामगार" या पदावर कायम कर्मचारी म्हणुन कार्यरत होत्या त्या दि.०६/०२/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा मुलगाश्री. प्रविण सुनिल लोखंडे यांनी दि.१५/०२/२०२२ रोजी अर्ज देऊन "आईच्या जागेवर लाड पागे-समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी"अशी विनंती करुन सोबत खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत.

१.लहान कुटुंबाचे स्वयंघोषणापत्र (मुळ प्रत)२.कुटुंबात कोणीही शासकीय/निमशासकीय नोकरीला नसल्याचे स्वयंघोषणापत्र (मुळ प्रत)३.कुटुंबाचे पालन पोषन करणेचे स्वयंघोषणापत्र. (मुळ प्रत)४.एकत्रीत कुटुंबात रहात असलेबाबतचे स्वयंघोषणापत्र. (मुळ प्रत)५.कुटुंबातील इतर व्यक्तींचे त्यांना नोकरी देण्याचे स्वयंघोषणापत्र.(मुळ प्रत)६.सेवानिवृत्त कर्मचा-याचा मुलास नोकरी देण्याचे स्वयंघोषणापत्र.(मुळ प्रत)७.शाळा सोडल्याचा दाखला (स्वसाक्षाकींत प्रत)८.जन्म प्रमाणपत्र ( स्वसाक्षाकींत प्रत) ९.जातीचा दाखला. (स्वसाक्षाकींत प्रत)१०.शिधापत्रिका.(स्वसाक्षाकींत प्रत)११.सेवा योजन कार्यालयाकडे नोंद केलेची स्लीप.(स्वसाक्षाकींत प्रत)१२.आधारकार्ड (स्वसाक्षाकींत प्रत)१३.मतदार ओळखपत्र.( स्वसाक्षाकींत प्रत) १४.ई. १० वी व १२ वी पासचे गुणपत्रक.( स्वसाक्षाकींत प्रत) १५.एफ़.वाय.बी.ए. पासचे गुणपत्रक.( स्वसाक्षाकींत प्रत) १६.एज ॲण्ड डोमॅसाईल सर्टीफ़िकेट.( स्वसाक्षाकींत प्रत) १७.से. नि. सफ़ाई कामगार श्रीमती. कविता सुनिल लोखंडे यांचा नेमणुक आदेश, सेवानिवृत्ती आदेश, जातीचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माहेर व सासरकडील दोन्ही नावाची व्यक्ती एकचे असलेचे प्रतिज्ञापत्र व सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत, इत्यादी कागदपत्रांच्या स्वसाक्षाकींत प्रत.

तसेच सेवानिवृत्त सफ़ाई कामगार श्रीमती. कविता सुनिल लोखंडे यांनी दिनांक १५/०२/२०२२ रोजी अर्ज देऊन " त्यांचे जागेवर लाडपागे समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने मुलगा श्री. प्रविण सुनिल लोखंडे यांची सफ़ाई कामगार पदावर नियुक्ती करावी." अशी विनंती केलेली आहे.

उपरोक्त नमुद आवश्यक असलेली कागदपत्र सादर केलेली आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील नमुद मा.शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोंबर,२०११, दिनांक २६ फ़ेब्रुवारी,२०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च,२०१६ मधील प्रमुख तरतुदीची पुर्तता केलेची दिसुन येत आहे.

| अ. क्र | प्रमुख तरतुदी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| अ) | सफ़ाई कामगारांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर,स्वेच्छा निवृत्तीनंतर, किंवा शासन सेवापुर्ण करण्यास वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी.व वारसा हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात याव्यात.१) पती/ पत्नी २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४) विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी ५) विधवा / घटस्फ़ोटीत बहीण.६) वरीलपैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफ़ाई कामगांराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती. | श्रीमती. कविता सुनिल लोखंडे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचे श्री. प्रविण सुनिल लोखंडे हे त्यांचे मुलगा असुन सदर शासन तरतुदीनुसार **" मुलगा "** हा वारस हक्कास पात्र व्यक्ती आहेत. |
| (ब) | सफ़ाई कर्मचा-याच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत असल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येनार नाही. | कुटुंबात कोणीही शासकीय/ निमशासकीय सेवेत नसल्याचे क्र. झ ेड एन ५४८७४० दि.११/०२/२०२२ रोजीचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| क) | वारसा हक्कास पात्र असणा-या व्यक्तीपैकी कोणाही एकास निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/ वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगारांच्या/कर्मचा-याच्या शिफ़ारशीनुसार नोकरी हक्क द्यावा.मात्र मृतकामगाराच्या / कर्मचा-याच्या बाबतीत वरील (अ) मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी एकास नोकरीस घ्यावे. | श्रीमती. कविता सुनिल लोखंडे, सफ़ाई कामगार ह्या दि. ०६/०२/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले असुन त्यांनी दिनांक १५/०२/२०२२ रोजीच्या विनंती अर्जानुसार संमतीपत्र व स्वयंघोषणापत्र. क्र. झेड.एन. ५४८७४३ दि. ११/०२/२०२२ अन्वये मुलगा श्री. प्रविण सुनिल लोखंडे यांना नोकरी देण्याचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| ड ) | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे. | एकत्रित कुटुंबात रहात असले बाबतचा पुरावा म्हणुन प्रतिज्ञापत्र / स्वयंघोषणापत्र क्र. झेड एन ५४८७४२ दि.११/०२/२०२२अन्वये व शिधापत्रिका अ. क्र. डब्ल्यु. जी. ०३२३२२८ची स्वसाक्षाकींत प्रत सादर केलेले आहे. |
| उ) | सफ़ाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या मुदतीत सफ़ाई कर्मचा-याच्या पात्र कुंटुबियाकडुन नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिका-याकडे वारसाहक्काने नियुक्ती मिळण्याकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील | श्रीमती. कविता सुनिल लोखंडे, सफ़ाई कामगार ह्या दिनांक ०६/०२/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे जागेवर त्यांचा मुलगा श्री. प्रविण सुनिल लोखंडे यांनी दि. १५/०२/२०२२ रोजी एक वर्षाच्या मुदतीत वारसा हक्काने नोकरी मिळणेचा आर्ज सादर केलेला आहे. |
| ३) | सफ़ाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसुचीत जातीमधील इतर सफ़ाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | श्रीमती. कविता सुनिल लोखंडे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांनी सादर केलेला जातीचा दाखला व मुलगा श्री. प्रविण सुनिल लोखंडे यांनी सादर केलेला जातीचा दाखला पहाता ते मांग या जातीचे असुन ते अनुसुचीत जाती प्रवर्गातील आहेत. |
| ४) | सदरहु निर्णय राज्यातील सर्व विभागातील सफ़ाई कामगारांच्या वारसांना लागु राहतील. | श्रीमती. कविता सुनिल लोखंडे ह्या अहमदनगर महानगरपालिकेत सफ़ाई कामगार या पदावर कार्यरत असतांना स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या वारसास सदर तरतुदी लागु होतात. |

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका सर्व साधारण सभेने प्रस्ताव क्र.६ दि.२०-११-२००४ अन्वये "भविष्यात बर्वे, लाड व मलकानी समितीच्या शिफ़ारशीनुसार व वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरणा-या वारसांना प्रशासकीय पातळीवर छाणनी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देणेस मंजुरी देण्यांत येत आहे." असा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे.

तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनेनुसार "शासन सेवेतील गट अ ते ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान

कुटूंबाची अतिरिक्त अट लागु करणे बाबत सुचित केलेले आहे व प्रतिज्ञापन नमुना अ नुसार सर्व उमेदवारांकडुन प्रतिज्ञापत्र घेणे बाबत निर्देश दिलेले आहे." तथापी श्री. प्रविण सुनिल लोखंडे यांनी लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापन क्र.झेड एन ५४८७३९ दिनांक ११/०२/२०२२ रोजीचे सादर केलेले आहे.

त्याचबरोबर शासन निर्णय वित्त विभाग दि.३१ आक्टोंबर २००५ च्या आदेशाने "राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेबंर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत कळविले आहे व अशा उमेदवारांना त्यांची सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल.

मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही." असे कळविणे बाबत आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टीआरएम-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ दिनांक २३ संप्टेंबर,२०११ नुसार नियुक्ती दिनाकांपासुन सहा महिण्यात पायाभुत प्रशिक्षण अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मार्फ़त पुर्ण करणे अनिवार्य करण्यात आलेले असुन. सदरचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतरच परिविक्षाधिन कालावधी समाप्त करण्यात येईल, ही अट नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तथापी सदरचे प्रशिक्षण ६ महिण्याचे मुदतीत होत नसल्याने भविष्यात सदर प्रशिक्षणास नियुक्ती झाल्यास प्रशिक्षणास जाणेस बंधनकारक राहील.याअटीवर नियुक्ती करणे उचित होईल.

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका मा. सभेने ठराव क्र.५२ दिनांक १६/०३/२०१६ अन्वये "सफ़ाई व मेहतर कामगारांना नियुक्ती देताना एकत्रीत वेतनाऐवजी नियमित वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच सफ़ाई व मेहतर कामगारांना नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती देताना मा. शासन निर्णयानुसार परिविक्षाधिन कालावधी हा २ वर्षाचा नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तसेच वर्ग ४ मधील सफ़ाई/मेहतर कामगारापदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे-१३००अशी आहे.

तसेच शासन दिनांक ६ फ़ेब्रुवारी,२०१६ ची अधिसुचना अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम,२०१६ ) परिशिष्ट २ अ. क्र.९३ मध्ये नामनिर्देश/ लाडपागे समितीच्या शिफ़ारशीनुसार सफ़ाई कामगारांच्या नेमणुकीकरिता अर्हता (अ) ई. ४ थी उत्तीर्ण (ब) मराठी लिहीता वाचता, बोलता येणे आवश्यक आहे" असे नमुद केलेले आहे.

मा. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि. २८ ऑगस्ट,२०१७ नुसार शासन सेवेत नेमणुक करताना उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना घेऊन जा. क्र. आस्था.५०१ दि.१८/०२/२०२२ अन्वये मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडुन उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य यांची माहिती मागविण्यात आली असता, त्यांनी जा. क्र. जिविशा /चा.पडताळणी/२७/२०२२ दि.०१/०३/२०२२ अन्वये " श्री. प्रविण सुनिल लोखंडे यांची चारित्र्य पडताळणी करण्यात आलेली असुन त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन रेकॉर्डला गुन्हा, दंड अगर शिक्षा झाले बाबत नोंद आढळुन आलेली नाही" असे इकडेस कळविलेले आहे.

मा. शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक सफ़ाई-२०२१/ प्र. क्र. १३७/ नवि-६ दिनांक १० डिसेंबर, २०२१ चे परिपत्रकान्वये" महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील सफ़ाई कर्मचा-यांच्या

वारसांना वारसा हक्काने नियुक्त्या विहीत (३० दिवसांच्या आत) कालावधीत नियुक्त्या देण्याबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

" सफ़ाई कर्मचा-यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्तीबाबतच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत असल्यास, संबधित मुख्याधिकारी / आयुक्त यांनी संबधीत वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ, याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या, नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतीत स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवाव्या."

सेवानिवृत्त कर्मचारी श्रीमती. कविता सुनिल लोखंडे, सफ़ाई कामगार यांचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व हुद्दा** | **जन्म दिनांक** | **शैक्षणिक पात्रता** | **नेमणुक दिनांक** | **सेवानिवृत्त दि. व एकुण सेवा** | **जात प्र-वर्ग** |
|---|---|---|---|---|---|
| श्रीमती. कविता सुनिल लोखंडे, सफ़ाई कामगार | २७/०२/१९७५ | ई. ४ थी | २२/०८/१९९७ | ०६/०२/२०२२ स्वेच्छा से. नि. २४ वर्ष | मांग (अनु.जाती.) |

वारसाचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **अर्जदाराचे नांव व नाते** | **शैक्षणिक पात्रता** | **जन्म दिनांक** | **जात प्र-वर्ग** | **द्यावयाचे पदाचे नांव** | **सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन ब्रॅण्ड** |
|---|---|---|---|---|---|
| श्री. प्रविण सुनिल लोखंडे, मुलगा | एफ़. वाय. बी. ए. पास | २३/०७/१९९६ वय- २६ वर्षे (जन्म प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखल्यावरुन ) | हिंदु-मांग (अनु.जाती ) | सफ़ाई कामगार | ४४४०-७४४० यामध्ये वेतन ४४४० अधिक ग्रेड पे र १३०० |

तरी, उपरोक्त नमुदनुसार तसेच शासन निर्णयाच्या अटीनुसार, लाड कमिटीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने, मा. महानगरपालिका ठरावानुसार अहमदनगर महानगरपालिकेतील श्रीमती. कविता सुनिल लोखंडे, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री. प्रविण सुनिल लोखंडे यांना " सफ़ाई कामगार " या पदावर ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे- १३०० या मध्ये मुळवेतन र ४४४० अधिक ग्रेड पे १३०० अधिक नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नियुक्ती आदेश देण्यास व सदर नियुक्तीस कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त(सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मान्यतेस्तव सादर. यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने अहमदनगर महानगरपालिकेत श्रीमती कवीता सुनिल लोखंडे स.का.यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री.प्रविण सुनिल लोखंडे यांना सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने अहमदनगर महानगरपालिकेत श्रीमती कवीता सुनिल लोखंडे स.का.यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री.प्रविण सुनिल लोखंडे यांना सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने अहमदनगर महानगरपालिकेत श्रीमती कवीता सुनिल लोखंडे स.का.यांच्या जागेवर त्यांचा मुलगा श्री.प्रविण सुनिल लोखंडे यांना सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मीना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

---

**विषय क्रमांक : ६६** **दिनांक :- २६/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने अहमदनगर महानगरपालिकेत सौ.नंदा रखमाजी जगधने स.का.यांच्या जागेवर आकाश शिवाजी जगधने यांना सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सौ. नंदा रखमाजी जगधने ह्या अहमदनगर महानगरपालिकेत दि. १२/०६/२००१ पासुन "सफ़ाई कामगार" या पदावर कायम कर्मचारी म्हणुन कार्यरत होत्या, त्या दि. २२/०३/२०२२ पासुन स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा भावाचा मुलगा ( श्री. शिवाजी रखमाजी जगधने यांचा मुलगा) भाचा श्री. आकाश शिवाजी जगधने यांनी दिनांक ३०/०३/२०२२ रोजी अर्ज देऊन " आत्या सौ. नंदा रखमाजी जगधने, सफ़ाई कामगार यांचे जागेवर लाड पागे-समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने सफ़ाई कामगार पदावर नोकरी मिळावी" अशी विनंती करुन सोबत खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत.
१.सेवानिवृत्त कर्मचा-याचा भाच्यास नोकरी देण्याचा संमतीअर्ज.२.सेवानिवृत्त कर्मचा-याचा भाच्यास नोकरी देण्याचे स्वंयघोषणापत्र.( मुळ प्रत) ३.कुटुंबातील इतर व्यक्तींचे त्यांना नोकरी देण्याचे स्वंयघोषणापत्र.( मुळ प्रत)४.सेवानिवृत्त कर्मचारी (आत्याचे) व कुटुंबाचे पालन पोषन करणेचे स्वंयघोषणापत्र.(मुळ प्रत)५.लहान कुटुंबाचे स्वंयघोषणापत्र.( मुळ प्रत)६.शाळा सोडल्याचा दाखला (स्वसाक्षाकींत प्रत)७.जन्म घरी झाल्याने शाळा सोडल्याच्या दाखल्यावरील जन्म दि. १०/०२/१९८८ ही ग्राह्य धरणेबाबत. ( स्वयंघोषणापत्र.) ८.जातीचा दाखला. (स्वसाक्षाकींत प्रत)९.शिधापत्रिका.(स्वसाक्षाकींत प्रत)१०.सेवा योजन कार्यालयाकडे नोंद केलेची स्लीप.(स्वसाक्षाकींत प्रत)११.आधारकार्ड (स्वसाक्षाकींत प्रत)१२.आई श्रीमती. सुशिला शिवाजी जगधने, सफ़ाई कामगार यांचे व्यतिरिक्त कुटुंबात कोणीही शासकीय/निमशासकीय नोकरीला नसल्याचे स्वंयघोषणापत्र.(मुळ प्रत)१३.एकत्रीत कुटुंबात रहात असलेबाबतचे स्वंयघोषणापत्र.(मुळ प्रत)१४.मतदार ओळखपत्र.( स्वसाक्षाकींत प्रत)१५.सेवानिवृत्ती आदेश . ( छायाकींत प्रत)

तसेच श्री. आकाश शिवाजी जगधने यांनी अपुर्ण कागदपत्र सादर केलेली असल्याने त्यांनी पुन्हा दिनांक ०५/०४/२०२२ रोजी अर्ज देऊन " आत्याच्या जागेवर नोकरी मिळणेस विनंती करुन सोबत खालील नमुदनुसार कागदपत्र सादर केलेली आहेत."

१.सेवानिवृत्त सफ़ाई कामगार सौ. नंदा रखमाजी जगधने यांना पती श्री. राजाराम तात्याबा शिंदे हे असुन त्यांना मुलगा, सुन, अविवाहीत मुलगी, विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी, विधवा/ घटस्फ़ोटोत बहीण इत्यादी कोणीही नसुन सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्याचे श्री. आकाश शिवाजी जगधने यांनी केलेले स्वयंघोषणापत्र.(मुळ प्रत)
२. सेवानिवृत्त सफ़ाई कामगार सौ. नंदा रखमाजी जगधने यांना पती श्री. राजाराम तात्याबा शिंदे हे असुन त्यांना मुलगा, सुन, अविवाहीत मुलगी, विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी, विधवा / घटस्फ़ोटोत बहीण इत्यादी कोणीही नसुन सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्याचे स्वयंघोषणापत्र.(मुळ प्रत)
३.माहेरचे नाव नंदा रखमाजी जगधने व सासरकडील नाव नंदा राजू उर्फ़ राजाराम शिंदे या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच असल्याचे स्वयंघोषणापत्र. ( मुळ प्रत)
४.पती राजाराम तात्याबा शिंदे व विवाहीत मुलींचे नोकरी देण्याचे संमतीपत्र.(मुळ प्रत)
५.सेवानिवृत्त सफ़ाई कामगार सौ. नंदा रखमाजी जगधने यांचा नेमणुक आदेश, आधार कार्ड, श्री. आकाश जगधने यांचा एज ॲण्ड डोमॅसाईल सर्टीफ़िकेट, शाळा सोडल्याचा दाखला, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र, जातीचा

दाखला, सेवानिवृत्त कर्मचा-याचे भाऊ श्री. जगधने शिवाजी रखमाजी यांचा जातीचा दाखला व शाळा सोडल्याचा दाखला व मृत्यु प्रमाणपत्र सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत. ( स्वसाक्षाकींत प्रत)

६.इयत्ता ९वी पासचे डुप्लीकेट गुणपत्रक.( स्वसाक्षाकींत प्रत)

उपरोक्त नमुद आवश्यक असलेली कागदपत्र सादर केलेली आहेत.सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील नमुद मा.शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोंबर,२०११, दिनांक २६ फेब्रुवारी,२०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च,२०१६ मधील प्रमुख तरतुदीची पुर्तता केलेची दिसुन येत आहे.

| अ.क्र | प्रमुख तरतुदी | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| अ) | सफ़ाई कामगारांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर,स्वेच्छा निवृत्तीनंतर, किंवा शासन सेवापुर्ण करण्यास वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी.व वारसा हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात याव्यात.१) पती/ पत्नी २) मुलगा/सुन ३) अविवाहीत मुलगी ४) विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी ५) विधवा / घटस्फ़ोटीत बहीण.६) वरीलपैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफ़ाई कामगांराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती. | सौ. नंदा रखमाजी जगधने स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांनी दि. ३०/३/२०२२ रोजीच्या संमतीअर्ज व स्वयंघोषणापत्र क्र. झेड.एन.९९२६६३ दि. २५/०३/२०२२ अन्वये त्यांचा (भावाचा मुलगा) भाचा श्री. आकाश शिवाजी जगधने यांना नोकरी देण्याचे संमतीपत्र सादर केलेले आहे.<br>सौ. नंदा रखमाजी जगधने, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांचे पती १) श्री. राजाराम तात्याबा शिंदे २) सौ. शितल सचिन चव्हाण,विवाहीत मुलगी ३) सौ. सोनाली करण मातंग, विवाहीत मुलगी यांनी श्री. आकाश शिवाजी जगधने यांना नोकरी देण्याचे स्वयंघोषणापत्र क्र. झेड. एल. ०६४४०८ दि.३१/०३/२०२२ सादर केलेले आहे.<br>तसेच सौ. नंदा रखमाजी जगधने, स्वे. से. नि. सफ़ाई कामगार यांनी त्यांचे पती व्यतिरिक्त त्यांना मुलगा, सुन, अविवाहीत मुलगी, विधवा / घटस्फ़ोटीत मुलगी, विधवा / घटस्फ़ोटोत बहीण इत्यादी कोणीही नसुन सफ़ाईचे काम करण्यास तयार नसल्याचे स्वयंघोषणापत्र क्र. झेड. एल.०७५१६२ दि. ०५/०४/२०२२ चे सादर केलेले आहे.<br>तसेच श्री. आकाश शिवाजी जगधने यांनी त्यांची आत्या सौ. नंदा रखमाजी जगधने व कुटुंबाचे पालन पोषण / सांभाळ करण्याचे स्वयंघोषणापत्र क्र. झेड. एन. ९९२६६१ दि.२५/०३/२०२२ चे सादर केलेले आहे. कोणीही नामनिर्देशित व्यक्ती म्हणुन श्री. आकाश शिवाजी जगधने हे वारस हक्कास पात्र व्यक्ती आहेत. |
| (ब) | सफ़ाई कर्मचा-याच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत असल्यास वारसा हक्काच्या नियमास बाधा येनार नाही. | श्री. आकाश शिवाजी जगधने यांनी त्यांच्या आई श्रीमती. सुशिला शिवाजी जगधने ह्या मनपात सफ़ाई कामगार म्हणुन सेवेत असुन त्यांच्या व्यतिरिक्त कुटुंबात कोणीही शासकीय / निमशासकीय सेवेत नसल्याचे स्वंयघोषणापत्र क्र.झेड.एन.९९२६६० दि. २५/०३/२०२२ अन्वये प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. |
| क) | वारसा हक्कास पात्र असणा-या व्यक्तीपैकी कोणाही एकास निवृत्त/स्वेच्छा निवृत्त/ वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगारांच्या / कर्मचा-याच्या शिफ़ारशीनुसार नोकरी हक्क द्यावा.मात्र मृतकामगाराच्या / कर्मचा-याच्या बाबतीत वरील (अ) मधील पात्र व्यक्तींच्या संयुक्त संमतीपत्राने त्यापैकी एकास नोकरीस घ्यावे. | सौ. नंदा रखमाजी जगधने, सफ़ाई कामगार ह्या दिनांक २२/०३/२०२२ पासुन स्वेच्छेने सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी त्यांचा भावाचा मुलगा भाचा श्री.आकाश शिवाजी जगधने यांना वारसा हक्काने नोकरी देण्याचे दि.--/०३/२०२२ रोजीचा संमतीअर्ज व स्वयंघोषणापत्र क्र. झेड. एन. ९९२६६३ दि.२५/०३/२०२२ अन्वये सादर केलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ड ) | वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे. | एकत्रित कुटुंबात रहात असले बाबतचे स्वयंघोषणापत्र क्र. झेड. एन.९९२६६२ दि. २५/३/२०२२ रोजीचे सादर केलेली आहे. तसेच शिधापत्रिका डब्ल्यु. जी. ०३२८४८३ ची स्वसाक्षाकींत प्रत सादर केलेली आहे. |
| उ) | सफ़ाई कर्मचारी दिवंगत किंवा सेवानिवृत्त अगर विकलांग झाल्याच्या दिनांकापासुन १ वर्षाच्या मुदतीत सफ़ाई कर्मचा-याच्या पात्र कुंटुबियाकडुन नामनिर्देशित केलेल्या वारसदार व्यक्तीने सक्षम प्राधिका-याकडे वारसाहक्काने नियुक्ती मिळण्याकरिता अर्ज सादर करणे आवश्यक राहील | सौ. नंदा रखमाजी जगधने, सफ़ाई कामगार ह्या दिनांक २२/०३/२०२२ पासुन स्वेच्छेने सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे जागेवर त्यांचा भावाचा मुलगा भाचा श्री. आकाश शिवाजी जगधने यांनी दि. १५/०३/२०२२ रोजी एक वर्षाच्या मुदतीत वारसा हक्काने नोकरी मिळणेचा आर्ज सादर केलेला आहे. |
| ३) | सफ़ाई कर्मचारी म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणा-या अथवा स्वेच्छानिवृत्ती घेणा-या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसुचीत जातीमधील इतर सफ़ाई कर्मचा-यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा. | स्वे. से. नि. सौ. नंदा रखमाजी जगधने, सफ़ाई कामगार व भाचा श्री. आकाश शिवाजी जगधने यांनी सादर केलेला जातीचा दाखला पहाता ते हिंदू - मांग या जातीचे असुन ते अनुसुचीत जातीमधील आहेत. |
| ४) | सदरहु निर्णय राज्यातील सर्व विभागातील सफ़ाई कामगारांच्या वारसांना लागु राहतील. | सौ. नंदा रखमाजी जगधने ह्या अहमदनगर महानगरपालिकेत सफ़ाई कामगार या पदावर कार्यरत असतांना दि. २२/०३/२०२२ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या वारसास सदर तरतुदी लागु होतात. |

त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिका सर्व साधारण सभेने प्रस्ताव क्र.६ दि.२०-११-२००४ अन्वये "भविष्यात बर्वे, लाड व मलकानी समितीच्या शिफ़ारशीनुसार व वेळोवेळीच्या शासनाच्या निर्देशानुसार पात्र ठरणा-या वारसांना प्रशासकीय पातळीवर छाणनी करुन आयुक्तांच्या मंजुरीने नेमणुका देणेस मंजुरी देण्यांत येत आहे." असा ठराव मंजुर करण्यांत आलेला आहे.

तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च २००५ च्या अधिसुचनेनुसार "शासन सेवेतील गट अ ते ड मधील सर्व पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहीत केलेली लहान कुटूंबाची अतिरिक्त अट लागु करणे बाबत सुचित केलेले आहे व प्रतिज्ञापन नमुना अ नुसार सर्व उमेदवारांकडुन प्रतिज्ञापत्र घेणे बाबत निर्देश दिलेले आहे." तथापी श्री. आकाश शिवाजी जगधने यांनी लहान कुटुंबाचे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापन क्र. झेड. एन.९९२६५९ दिनांक २५/०३/२०२२ रोजीचे स्वयंघोषणापत्र सादर केलेले आहे.

त्याचबरोबर शासन निर्णय वित्त विभाग दि. ३१ आक्टोंबर २००५ च्या आदेशाने "राज्य शासनाच्या सेवेत दि. १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्याबाबत कळविले आहे व अशा उमेदवारांना त्यांची सेवेत नियुक्ती होताच त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल.

मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंश राशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही." असे कळविणे बाबत आदेश दिलेले आहेत.

तसेच मा.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टीआरएम-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ दिनांक २३ संप्टेंबर,२०११ नुसार नियुक्ती दिनाकांपासुन सहा महिण्यात पायाभुत प्रशिक्षण अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचे मार्फ़त पुर्ण करणे अनिवार्य करण्यात आलेले असुन. सदरचे प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतरच परिविक्षाधिन कालावधी समाप्त करण्यात येईल, ही अट नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तथापी सदरचे प्रशिक्षण ६ महिण्याचे मुदतीत होत नसल्याने भविष्यात सदर प्रशिक्षणास नियुक्ती झाल्यास प्रशिक्षणास जाणेस बंधनकारक राहील.याअटीवर नियुक्ती करणे उचित होईल.

अहमदनगर महानगरपालिका मा. सभेने ठराव क्र.५२ दि. १६/३/२०१६अन्वये "सफ़ाई व मेहतर कामगारांना नियुक्ती देताना एकत्रीत वेतनाऐवजी नियमित वेतन श्रेणीनुसार वेतन देण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच सफ़ाई व मेहतर कामगारांना नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती देताना मा. शासन निर्णयानुसार परिविक्षाधिन कालावधी हा २ वर्षाचा नियुक्ती आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

तसेच वर्ग ४ मधील सफ़ाई/मेहतर कामगारापदांची ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे-१३००अशी आहे.

तसेच शासन दिनांक ६ फ़ेब्रुवारी,२०१६ ची अधिसुचना अहमदनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम,२०१६ ) परिशिष्ट २ अ. क्र.९३ मध्ये नामनिर्देश/ लाडपागे समितीच्या शिफ़ारशीनुसार सफ़ाई कामगारांच्या नेमणुकीकरिता अर्हता (अ) ई. ४ थी उत्तीर्ण (ब) मराठी लिहीता वाचता, बोलता येणे आवश्यक आहे" असे नमुद केलेले आहे.

मा. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दि. २८ ऑगस्ट,२०१७ नुसार शासन सेवेत नेमणुक करताना उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना घेऊन जा. क्र. आस्था.१००५ दि.१२/०४/२०२२ अन्वये मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडुन उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य यांची माहिती मागविण्यात आली असता, त्यांनी जा.क्र. जिविशा /चा.पडताळणी/४७/२०२२ दि. १८/०४/२०२२ अन्वये " श्री. आकाश शिवाजी जगधने यांची चारित्र्य पडताळणी करण्यात आलेली असुन, त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन रेकॉर्डला गुन्हा, दंड अगर शिक्षा झाले बाबत नोंद आढळुन आलेली नाही" असे इकडेस कळविलेले आहे.

मा. शासन, नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक सफ़ाई-२०२१/ प्र. क्र. १३७/ नवि-६ दिनांक १० डिसेंबर, २०२१ चे परिपत्रकान्वये" महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतीमधील सफ़ाई कर्मचा-यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्त्या विहीत (३० दिवसांच्या आत) कालावधीत नियुक्त्या देण्याबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

" सफ़ाई कर्मचा-यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्तीबाबतच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत असल्यास, संबधित मुख्याधिकारी / आयुक्त यांनी संबधीत वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ, याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या, नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतीत स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवाव्या."

सेवानिवृत्त कर्मचारी सौ. नंदा रखमाजी जगधने, सफ़ाई कामगार यांचा सर्व तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व हुद्दा** | **जन्म दिनांक** | **शैक्षणिक पात्रता** | **नेमणुक दिनांक** | **सेवानिवृत्त दि. व एकुण सेवा** | **जात प्र-वर्ग** |
|---|---|---|---|---|---|
| सौ.नंदा रखमाजी जगधने, सफ़ाई कामगार | ०३/०४/१९७५ | ई. ३ री | १२/०६/२००१ | २२/०३/२०२२ स्वेच्छा से. नि. २० वर्ष ०६ महिने | हिंदु-मांग (अनु.जाती.) |

वारसाचा तपशील खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| अर्जदाराचे नांव व नाते | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | जात प्र-वर्ग | द्यावयाचे पदाचे नांव | सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन ब्रॅण्ड |
|---|---|---|---|---|---|
| श्री. आकाश शिवाजी जगधने, भाचा (भावाचा मुलगा) | ई. ९ वी पास | १०/०२/१९८८ वय- ३४ वर्षे (शाळा सोडल्याचा दाखल्यावरुन ) | हिंदु-मांग (अनु.जाती ) | सफ़ाई कामगार | ४४४०-७४४० यामध्ये वेतन ४४४० अधिक ग्रेड पे र १३००/- |

तरी, उपरोक्त नमुदनुसार तसेच शासन निर्णयाच्या अटीनुसार, लाड कमिटीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने, मा. महानगरपालिका ठरावानुसार सौ. नंदा रखमाजी जगधने, सफ़ाई कामगार ह्या स्वेच्छा सेवानिवृत्त झ ाालेल्या असुन त्यांनी उपरोक्त नमुद १ ते ५ येथील पती व्यतिरिक्त इतर कोणीही वारस उपलब्ध नसल्याचे नमुद केलेले असल्याने व त्यांचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेतलेली असल्याने त्यांच्या जागेवर लाड-पागे समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसा हक्काने कोणीही नामनिर्देशित व्यक्ती म्हणुन त्यांचा भावाचा मुलगा भाचा श्री. आकाश शिवाजी जगधने यांना " सफ़ाई कामगार " या पदावर ६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे- १३०० या मध्ये मुळवेतन र ४४४० अधिक ग्रेड पे १३०० अधिक नियमाप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते यावर नियुक्ती आदेश देण्यास व सदर नियुक्तीस कार्योत्तर मजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यास प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रमाणे मंजुरीस सादर.

यावर मा.उपायुक्त(सा ) प्रस्तावित "अ" नुसार आस्थापना प्रमुख यांचे छाननीनुसार व मा.स्थायी समितीसमोर कार्योत्तर मान्यतेस ठेवण्याच्या अटीवर मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने अहमदनगर महानगरपालिकेत सौ.नंदा रखमाजी जगधने स.का.यांच्या जागेवर आकाश शिवाजी जगधने यांना सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने अहमदनगर

महानगरपालिकेत सौ.नंदा रखमाजी जगधने स.का.यांच्या जागेवर आकाश शिवाजी जगधने यांना सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने अहमदनगर महानगरपालिकेत सौ.नंदा रखमाजी जगधने स.का.यांच्या जागेवर आकाश शिवाजी जगधने यांना सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

**विषय क्रमांक : ६७** **दिनांक :- २६/०७/२०२२**

-----------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड-पागे कमिटी शिफारशी नुसार वारसा हक्काने १) श्री.विशाल ईश्वर शेलार २) सौ.आशा सचिन चव्हाण ३) श्री.हितेश उमेश हरियाल ४) सौ.उज्वला राहुल मोरे५)श्री.सुमित पांडुरंग वैराळ ६) श्री.सनी राजू चव्हाण ७) श्री.गौरव संजय चावरे ८) श्री.प्रकाश उत्तम दिवटे यांना अहमदनगर महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

संदर्भ :- मा.शासन परिपत्रक,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ /प्र.क्र.१३७/नवि-६

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की,मा.शासन,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,परिपत्रक क्रमांक सफाई -२०११/प्र.क्र.३२७/विघयो-२ दिनांक २१ ऑक्टोबर २०११ व दिनांक २६ फेब्रुवारी २०१४ अन्वये (अ) नगरपालिका/ महानगरपालिकामधील सफाई कामगारांना त्यांच्या निवृत्तीनंतर,मृत्युनंतर,स्वेच्छानिवृत्तीनंतर किंवा वैदयकीय दृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात यावी.सदर वारस हक्कासाठी खालील व्यक्ती पात्र ठरविण्यात आल्या आहेत.पती / पत्नी२) मुलगा / सुन ३) अविवाहीत मुलगी ४) विधवा/घटस्फोटीत मुलगी ५) विधवा/घटस्फोटीत बहीण ६)वरील १ ते५ येथील कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसांपैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधीत सफाई कामगाराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती असे नमुद केलेले आहे.

तसेच मा.शासन,नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक सफाई -२०२१ /प्र.क्र.१३७/ नवि-६ दि.१० डिसेंबर २०२१ चे परिपत्रकान्वये महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायतीमधील सफाई कर्मचा-यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्त्या विहीत (३० दिवसांच्या आत ) कालावधीत नियुक्त्या देण्याबाबत खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"सफाई कर्मचा-यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्तीबाबच्या शासनाने निर्गमित केलेल्या तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील अटीची पुर्तता होत असल्यास,संबधित मुख्याधिकारी/आयुक्त यांनी संबधीत वारसास नियुक्ती देण्याची कार्यवाही तात्काळ,या बाबतचा अर्ज प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत करावी व नियुक्ती आदेशानंतरच्या लगतच्या,नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत तर महानगरपालिकांच्या बाबतील स्थायी समितीच्या सभेत या नियुक्त्या कार्योत्तर मंजुरीस्तव ठेवाव्या" असे नमुद आहे.

उपरोक्त मा.शासन परिपत्रक/ मा.शासन निर्णयामधील तरतुदीनुसार खालील तक्त्यात नमुदनुसार सफाई कामगारांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या पात्र वारसाला लाड-समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने मा.स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस अधीन राहून सफाई कामगार पदावर नियुक्ती दिलेली आहे.

| अ.नं. | सेवानिवृत्त सफाई कामगाराचे नाव व जात प्रवर्ग | सेवानिवृत्ती दिनांक | वारसाचे नांव ,नाते व जात प्रवर्ग | अर्ज दि.व संपुर्ण कागदपत्र सादर दि. | पदनाम आदेश क्र.व दि. | हजर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सौ.सुनिता ईश्वर शेलार,सफाई कामगार (हिंदु - मांग)(अनु-जाती) | १/०१/२०२२ रोजी वैदयकीय कारणास्तव से.नि. | श्री.विशाल ईश्वर शेलार,मुलगा (हिंदु-मांग)(अनु.जाती) | १०/३/२०२२ ४/४/२०२२ | सफाई कामगार जा.क्र.१९८९ दि.२३/०५/२०२२ | २६/५/२०२२ |
| २ | श्री.सचिन लाल चव्हाण,सफाई कामगार (हिंदु - भंगी)(अनु-जाती) | २५/४/२०२२ स्वेच्छा से.नि. | सौ.आशा सचिन हरियाल,पत्नी (हिंदु-भंगी)(अनु.जाती) | ४/५/२०२२ | सफाई कामगार जा.क्र.२१४४ दि.०३/०६/२०२२ | ८/६/२०२२ |
| ३ | श्री.उमेश नब्बु हरियाल,सफाई कामगार (हिंदु - भंगी)(अनु-जाती) | ०१/०३/२०२२ स्वेच्छा से.नि. | श्री.हितेश उमेश हरियाल,मुलगा (हिंदु - भंगी)(अनु-जाती) | १३/५/२०२२ | सफाई कामगार जा.क्र.२१४५ दि.०३/०६/२०२२ | १०/६/२०२२ |
| ४ | श्रीमती रंजना मच्छिंद्र दिवटे,सफाई कामगार (हिंदु - मांग)(अनु-जाती) | १६/०२/२०२२ वैद्यकीय कारणास्तव से.नि. | सौ.उज्वला राहुल मोरे,विवाहीत मुलगी (हिंदु - मांग)(अनु-जाती | २/५/२०२२ | सफाई कामगार जा.क्र.२१४३ दि.३/६/२०२२ | १०/६/२०२२ |
| ५ | श्री.पांडुरंग रोहीदास वैराळ,सफाई कामगार (हिंदु - मातंग)(अनु-जाती) | २/०४/२०२२स्वेच्छा से.नि. | सुमित पांडुरंग वैराळ,मुलगा (हिंदु - मातंग)(अनु-जाती) | ४/५/२०२२ | सफाई कामगार जा.क्र.२१४३ दि.३/६/२०२२ | ८/६/२०२२ |
| ६ | श्री.राजु लल्लु चव्हाण,सफाई कामगार (हिंदु - मेहतर)(अनु-जाती) | ३१/०३/२०२२नियत वयोमानानुसारसे.नि. | सनी राजू चव्हाण मुलगा (हिंदु - मेहतर)(अनु-जाती) | २९/४/२०२२ | सफाई कामगार जा.क्र.२१४१ दि.३/६/२०२२ | १३/६/२०२२ |
| ७ | श्री.संजय कालू चावरे सफाई कामगार (हिंदु- भंगी)(अनु.-जाती) | १९/०४/२०२२ स्वेच्छा से.नि. | गोरव संजय चावरे,मुलगा (हिंदु- भंगी)(अनु.-जाती) | २६/०४/२०२२ | सफाई कामगार जा.क्र.२२५० दि.१४/०६/२०२२ | २३/६/२०२२ |
| ८ | श्रीमती आशा उत्तम दिवटे,सफाई कामगार (हिंदु - मांग)(अनु-जाती) | ३०/०४/२०२२ स्वेच्छा से.नि. | प्रकाश उत्तम दिवटे,मुलगा (हिंदु - मांग)(अनु-जाती) | २३/५/२०२२ | सफाई कामगार जा.क्र.२२५१ दि.१४/६/२०२२ | २१/६/२०२२ |

तरी,संदर्भिय मा.शासन निर्णय/परिपत्रकान्वये १) श्री.विशाल ईश्वर शेलार२) सौ.आशा सचिन चव्हाण ३)श्री.हितेश उमेश हरियाल४)सौ.उज्वला राहुल मोरे५)श्री.सुमित पांडुरंग वैराळ६)श्री.सनी राजू चव्हाण७)श्री.गौरव संजय चावरे व ८) श्री.प्रकाश उत्तम दिवटे यांना लाड-पागे कमिटी शिफारशीनुसार वारसहक्कोने मा.स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस अधिन राहून सफाई कामगार पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या असुन सदरच्या नियुक्तीस येणा-या मा.स्थायी समितीच्या सभेत कार्योत्तर मंजुरीसाठी ठेवण्यात यावे हि विनंती.

मा.आयुक्त यांचे मान्यतेने.

येणे प्रमाणे सहाय्यक आयुक्त (आस्था) यांची कार्यालयीन टिपणी असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड-पागे कमिटी शिफारशी नुसार वारसा हक्काने १) श्री.विशाल ईश्वर शेलार २) सौ.आशा सचिन चव्हाण ३) श्री.हितेश उमेश हरियाल ४) सौ.उज्वला राहुल मोरे५)श्री.सुमित पांडुरंग वैराळ ६) श्री.सनी राजू चव्हाण ७) श्री.गौरव संजय चावरे ८) श्री.प्रकाश उत्तम दिवटे यांना अहमदनगर महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.मीना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड-पागे कमिटी शिफारशी नुसार वारसा हक्काने १) श्री.विशाल ईश्वर शेलार २) सौ.आशा सचिन चव्हाण ३) श्री.हितेश उमेश हरियाल ४) सौ.उज्वला राहुल मोरे५)श्री.सुमित पांडुरंग वैराळ ६) श्री.सनी राजू चव्हाण ७) श्री.गौरव संजय चावरे ८) श्री.प्रकाश उत्तम दिवटे यांना अहमदनगर महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार मा.शासन परिपत्रक ,नगर विकास विभाग क्रमांक सफाई -२०२१ / प्र.क्र. १३७ / नवि-६ दिनांक १० डिसेंबर २०२१ अन्वये लाड-पागे कमिटी शिफारशी नुसार वारसा हक्काने १) श्री.विशाल ईश्वर शेलार २) सौ.आशा सचिन चव्हाण ३) श्री.हितेश उमेश हरियाल ४) सौ.उज्वला राहुल मोरे५)श्री.सुमित पांडुरंग वैराळ ६) श्री.सनी राजू चव्हाण ७) श्री.गौरव संजय चावरे ८) श्री.प्रकाश उत्तम दिवटे यांना अहमदनगर महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर केलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मीना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

**विषय क्रमांक : ६८** **दिनांक :- २६/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे दिल्लीगेट येथील रस्ता रूंदीकरणकामी पाडण्यात आलेले एकुण ६६ गाळयांची सन २००९-२०१० पर्यतची थकबाकी ठेवून सन २०१०-२०११ ते आज अखेर थकबाकी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**संदर्भ :-** दि.३१/१२/२०१२ शहर वसुली विभाग कार्यालय प्रस्ताव व स्थायी समिती ठराव क्र.११ दि.२/६/२०१४ बाबत.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपलिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार वॉर्ड नं.२६ दिल्लीगेट येथील ६६ गाळयांची सन २००९-२०१० पर्यतची थकबाकी ठेवून सन २०१०-२०११ ते आज अखेर थकबाकी निर्लेखीत करणे कामी प्रशासकीय मान्यता घेवून स्थायी समिती ठराव क्र.११ दि.२/६/२०१४ अन्वये ठराव पारित झाले नुसार दिल्लीगेट येथील गाळेधारकांचे पुन्हा पुर्नवसन झालेले नाही.पुर्नवसन झाले नंतर हा प्रस्ताव फेर सादर करावा असा ठराव पारित झालेला आहे.परंतु सदर गाळे धारकांची थकबाकी मुळे डिमांड वाढत चालली असल्याने सदरची थकबाकी सन २००९-२०१० पर्यतची थकबाकी ठेवून सन २०१० -२०११ ते आज अखेर थकबाकी निर्लेखीत करणे कामी उचित कार्यवाहीस्तव सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.सहाय्यक मुल्य निर्धारक अधिकारी यांचा अभिप्राय की,सदर प्रस्ताव पुर्वी स्थायी समितीकडे पाठविला होता.परंतु त्यामध्ये गाळेधारकांचे पुर्नवसन झाले नंतर फेरप्रस्ताव सादर करावा असा ठराव झालेला होता.

पाडलेल्या गाळा भाडेकरी यांचे आज पर्यत पुर्नवसन झालेले नाही.आजमितीस गाळयावरील कर आकारणी चालू आहे.त्यामुळे अनावश्यक कराची डिमांड वाढत आहे.

तरी सन २००९-१० नंतरची होणारी कराची रक्कम ही वसुल न होणारी असल्याने सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्लेखीत करणे आवश्यक आहे.तरी सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,१.सन २००९-१० पर्यतची थकबाकी किती?२.सन २०१०-११ पासुन सद्यस्थितीपर्यतची थकबाकी किती?३.सदरचे ६६ गाळेधारक सध्या कुठे व्यवसाय करत आहेत?४.गाळे पाडल्याबाबत व पुर्नवसन केले नसलेबाबत अतिक्रमण/बांधकाम व मार्केट विभागाचे अहवाल घ्यावा.

उपरोक्त मुद्यांची पुर्तता करून सादर करावे.

यावर वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, दि.४/२/२०२० चे मा.उपायुक्त साहेब यांचे शेरांकना नुसार १. सन २००९/२०१० अखेर थकबाकी रू७,२६,६६२/- २. सन २०१०-२०११ पासुन आज अखेर थकबाकी ४७,३२,३०४/- निर्लेखित करावयाची रक्कम मुळ रक्क्म १४,९०,०६९/- २% शास्ती

रक्कम ३,२४,२२३/-एकुण रक्कम ४७,३२,३०४/- ३.सदर ६६ गाळेधारकांचे बिलावर गाळे धारकांचे पत्ते नसल्याने व्यवसायाबद्दल माहिती मिळत नाही.४.मार्केट विभाग जा.क्र.४९ दि.२२/४/२०१० अन्वये गाळे निष्कासित करण्यात आलेले आहेत.परंतु आज अखेर महानगरपालिकेने संबंधित गाळेधारकांचे पुर्नवसन झालेले नाही.परंतु गाळे निष्कासित केलेले पासुन आज पर्यत प्रत्यक्ष गाळयावरील कर आकारणी चालू आहे.यामुळे अनावश्यक कराची मागणी मध्ये वाढ होत आहे.

तथापी सन २०१०-२०११ पासुन आज अखेर कराची थकबाकी रक्कम वसुल न होणारी असल्याने उक्त प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्लेखित करणे आवश्यक आहे.तरी सदरचे प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मान्यतेसाठी सविनय सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,दिल्लीगेट येथील रस्ता रूंदीकरणाकरिता पाडण्यात आलेल्या ६६ गाळयांची थकबाकी निर्लेखित करणे बाबत वसुली लिपीक व कर निरीक्षक यांच्या टिप्पणी अहवालानुसार रिव्हीजन विभाग यांच्या अभिप्रायासह आदेशार्थ सादर.

यावर कर निर्धारण तथा कर संग्राहक यांचा अभिप्राय की,सदर दिल्लीगेट येथील ६६ गाळे धारकांबाबत चा सन २००९-२०१० पर्यतची थकबाकी तशीच ठेवून सन २०१०-११ ते २०१२-१३ पर्यतची थकबाकी रक्कम निर्लेखित करणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभा क्रमांक -२ विषय क्र.११ दि.२/६/२०१४ रोजी सभेसमोर आला असता, मा.स्थायी समिती यांनी सदर गाळेधारकांचे अदयाप पर्यत पुर्नवसन झालेले नाही.गाळेधारकांचे अदयाप पर्यत पुर्नवसन करण्यात यावे.त्यानंतर विभागाने प्रस्ताव फेरसादर करावा.परंतु अदयापर्यत सदर गाळेधारकांचे पुर्नवसन झालेले नाही.आजमीतीस ६६ गाळे अस्तीत्वात नसतांना आजपर्यत गाळयांवरील कर आकारणी चालू आहे.त्यामुळे कराची डिमांड वाढत आहे.सन २००९-१० नंतरची कराची रक्कम वसुल न होणारी असल्याने तसेच सदर मिळकती वरिल शास्ती व नोटीस फीची रक्कम मनपा अधि.अनुसुची "ड" प्रकरण -८ कराधान नियम ५१ नुसार मा.आयुक्त साहेब यांना आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार पुर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल.

तरी सन २०१०-११ पासुन आज पर्यत कराची रक्कम वसुल न होणारी असल्याने अधिनियमातील कलम १५२ नुसार सदरची रक्कम निर्लेखित साठी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे पाठविणे,फेरसादर करणे उचित होईल तथापी आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,सन २०१० -११ पासुन आजपर्यत कराची रक्कम वसुल न होणारी असल्याने कलम १५२ नुसार निर्लेखित करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे दिल्लीगेट येथील रस्ता रूंदीकरणकामी पाडण्यात आलेले एकुण ६६ गाळयांची सन २००९-२०१० पर्यतची थकबाकी ठेवून सन २०१०-२०११ ते आज अखेर थकबाकी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सौ.रूपाली बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.मिना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- SDRF चा किती निधी प्राप्त झालेला आहे.या निधीच्या खर्चास मा.स्थायी समितीचे अंतीम मान्यता घेतली का? SDRF खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र दिले आहे का? SDRF निधीला अंतीम मंजुरीकरीता पुढील स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे :- SDRF अंतर्गत ६.५० कोटींचा निधी आलेला आहे.त्यामधुन काही पेमेंट झ ाालेले आहेत.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी खर्चाचा प्रस्ताव आलेला नाही. SDRF अंतर्गत खर्च करावयाच्या बाबींकरीता मा.स्थायी समितीकडे विषय येणे आवश्यक आहे.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- कोविड २०१९ अंतर्गत निधी आलेला आहे.त्यामध्ये रूग्णवाहीका कोविड टेस्ट केंद्र उभारणी ,लसीकरण या करीता खर्च झालेला आहे.आरोग्य विभाग व बांधकाम विभाग या विभागामार्फत आलेला निधी खर्च करण्यात आलेला आहे.कोवीडच्या काळामध्ये सभा होत नसल्याने झालेल्या खर्चाचे विषय अखेर मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणार आहोत.

मा.श्री.मुदस्सर शेख :- २५ लाखाच्या वर खर्चाच्या फाईल्स असतील कर मंजुरी घेवून पुढे पाठवाव्या लागतील.

मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे :- ऑक्सीजन प्लॉन्ट उभारणी व शहरातील विविध भागामध्ये कंन्टेंनमेंट झोन करीता झालेल्या जादा खर्चस सभेने मंजूरी दिलेली आहे.,

मा.सभापती साहेब :- ऑक्सीजन प्लॅन्ट चे काम कोणत्या स्थीतीमध्ये आहे.प्लॅन्ट लवकरात लवकर कार्यान्वीत करा.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.गाडळकर :- दोन दिवसांध्ये ऑक्सीजन प्लॅन्टची प्राथमीक चाचणी घेणार आहोत व नंतर ट्रायल घेतेवेळी समीती सदस्यांना बोलावणार आहोत.

मा.सभापती साहेब :- SDRF निधी उपयोगीता प्रमाणपत्र घ्यावे लागणार का ? SDRF निधी बाबतची माहिति पुढील सभेध्ये देण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे :- मा.शासनाच्या निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र दयावे लागते.ज्या कामासाठी निधी दिलेला आहे.तो निधी त्याच कामाकरीता वापरलेला आहे.अशा बाबत प्रमाणपत्र दयावे लागते.

मा.सभापती साहेब :- प्रभाग समिती क्र.२,वॉर्ड नं.२६ शहर वसुली विभाग,.अहमदनगर महानगरपालिकेचे दिल्लीगेट येथील रस्ता रूंदीकरणकामी गाळे निष्कासित करण्यात आलेले आहेत.परंतु आज अखेर महानगरपालिकेने संबंधित गाळेधारकांचे पुर्नवसन झालेले नाही.परंतु गाळे निष्कासित केल्यापासुन आज पर्यत प्रत्यक्ष गाळयावरील कर आकारणी चालू आहे. दिल्लीगेट येथील ६६ ाळयांची सन २००९-२०१० पर्यतची थकबाकी तशीच ठेवून सन २०१०-२०११ पासुन आज अखेर कराची थकबाकी रक्कम वसुल न होणारी असल्याने कर आकारणची रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.तसेच कोविड २०१९ करीता SDRF अंतर्गत ६.५० कोटींचा निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.आरोग्य व बांधकाम या विभागामार्फत हा निधी, खर्च करण्यात आलेला आहे. मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी या निधी अंतर्गत खर्चाचे प्रस्ताव सादर करण्यात आलेले नाहीत.SDRF अंतर्गत प्राप्त निधीमधून खर्चाचे सर्व प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मंजुरी करीता तात्काळ पाठविण्यात यावेत.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार प्रभाग समिती क्र.२,वॉर्ड नं.२६ शहर वसुली विभाग,.अहमदनगर महानगरपालिकेचे दिल्लीगेट येथील रस्ता रूंदीकरणकामी गाळे निष्कासित करण्यात आलेले आहेत.परंतु आज अखेर महानगरपालिकेने संबंधित गाळेधारकांचे पुर्नवसन झालेले नाही.परंतु गाळे निष्कासित केल्यापासुन आज पर्यत प्रत्यक्ष गाळयावरील कर आकारणी चालू आहे. दिल्लीगेट येथील ६६गाळयांची सन २००९-२०१० पर्यतची थकबाकी तशीच ठेवून सन २०१०-२०११ पासुन आज अखेर कराची थकबाकी रक्कम वसुल न होणारी असल्याने कर आकारणची रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.तसेच कोविड २०१९ करीता SDRF अंतर्गत ६.५० कोटींचा निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.आरोग्य व बांधकाम या विभागामार्फत हा निधी, खर्च करण्यात आलेला आहे. मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी या निधी अंतर्गत खर्चाचे प्रस्ताव सादर करण्यात आलेले नाहीत.SDRF अंतर्गत प्राप्त निधीमधून खर्चाचे सर्व प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मंजुरी करीता तात्काळ पाठविण्यात यावेत.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मिना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

---

**विषय क्रमांक : ६९** **दिनांक :- २६/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री जनार्धन काशिनाथ मुंडलीक गांजे गल्ली, प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग ,वॉर्ड क्र.६ बील नं.Z२६०८०६९५या बीलावर प्रत्यक्षात १/२" दोन नळ कनेक्शन असुन ३/४" दोन नळे कनेक्शन ची आकारणी झाल्याने सदर बिलावर १/२" नुसार आकारणी करून उर्वरीत रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग.

प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली वॉ.क्र.६ चे वसुली लिपीक यांजकडून प्रस्ताव सादरकरण्यात येतो की,बील क्र.२२९ (मालमत्ता क्र.Z२६०८०६९५) घ.नं.३०४८ गांजे गल्ली या मालमत्तेवर जनार्धन काशिनाथ मुंडलिकया नावे मनपा अभिलेखा नोंद आहे.अर्जदार यांनी सदर मालमत्तेवर दोन १/२ इंची नळ कनेक्शन असतांना आम्हाला ३/४ इंची दोन नळ कनेक्शची पाणी पट्टी येत आहे.तरी आपल्या फिटर मार्फत पाहणी करून संपुर्ण पाणीपटटी बीलातुन सन २०१८-१९ पासुन रद्द करावी असे कळविले आहे.

त्यानुसार पाणीपुरवठा हेड फिटर यांनी दिनांक ८/२/२०२२ रोजी समक्ष पाहणी केली असता त्या ठिकाणी १/२इंची २नळ कनेक्शन आढळून आलेले आहेत असा रिपोर्ट दिलेला आहे.तसेच पाणी पुरवठा जा.क्र.१३५ दि.१७/५/२०२२ अन्वये १/२ इंची २ नळ कनेक्शन चे रू.३०००/-घरगुती वापर प्रमाणे भरलेले आहेत.परंतु सन २०१८-१९ या आर्थीक वर्षापासुन ३/४" इंचीचे २ नळ कनेक्शनची आकारणी झालेली आहे.सन २०२२/२३ अखेर सदर मालमत्तेवर ७७२१६/-येवढी घरपट्टी /पाणीपट्टीची थकबाकी आहे.तरी सन २०१८/१९ पासून अस्तित्वात नसलेले २ नळ कनेक्शन इंच पाणीपट्टी आकारणी झालेली रक्कम रू.१५,०००/- महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल कलम १५२ वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणे बाबत तरतुद असून उक्त कलमानुसार निर्लेखित करणेबाबत सविनय सादर.

तसेच महाराष्ट्र प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम ५१ नुसार शास्ती फि किंवा वसुलीचा खर्च माफ करता येईल अशी तरतुद असुन वसुल न होणा-या रकमेवरील सन २०१८ते२०२३ अखेर रू.१४९४५/- + शास्ती माफ करणेकामी प्रस्ताव मान्यतेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांचे प्रस्तावानुसार सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार मान्यतेस्तव तथापी आदेशार्थ सादर.

यावर सहा.कर मुल्य संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,विभागाने सादर केलेला प्रस्ताव "अ" व "ब" नुसार मान्यतेस्तव सादर तसेच प्रस्ताव "अ" नुसार मा.स्थायी समिती कडे पाठविणे उचित होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "ब" प्रमाणे मान्यतेस व "अ" प्रमाणे निर्लेखित करणे कामी मा.स्थायी समितीकडे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) स्थायी समिती कडे पाठविणेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री जनार्धन काशिनाथ मुंडलीक गांजे गल्ली, प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग ,वॉर्ड क्र.६ बील नं.Z२६०८०६९५या बीलावर प्रत्यक्षात १/२" दोन नळ कनेक्शन असुन ३/४" दोन नळे कनेक्शन ची आकारणी झाल्याने सदर बिलावर १/२" नुसार आकारणी करून उर्वरीत रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मीना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री जनार्धन काशिनाथ मुंडलीक गांजे गल्ली, प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग ,वॉर्ड क्र.६ बील नं.Z२६०८०६९५या बीलावर प्रत्यक्षात १/२" दोन नळ कनेक्शन असुन ३/४" दोन नळे कनेक्शन ची आकारणी झाल्याने सदर बिलावर १/२" नुसार आकारणी करून उर्वरीत रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्री जनार्धन काशिनाथ मुंडलीक गांजे गल्ली, प्रभाग समिती क्र.२ शहर वसुली विभाग ,वॉर्ड क्र.६ बील नं.Z२६०८०६९५या बीलावर प्रत्यक्षात १/२" दोन नळ कनेक्शन असुन ३/४" दोन नळे कनेक्शन ची आकारणी झाल्याने सदर बिलावर १/२" नुसार आकारणी करून उर्वरीत रक्कम निर्लेखित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मीना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

**विषय क्रमांक : ७०** **दिनांक :- २६/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मे.वायरलेस टी.टी.इन्फो सर्व्हिसेस लि, प्रभाग समिती क्र.४ ,वॉर्ड क्र.२४ बील नं.Z४२४१०८०३९ या बीलावर मोबाईल टॉवरची सन २०१५-२०१६ पासुन टॉवर काढल्याने मालमत्तेवर आकारण्यात आलेली रक्कम निर्लेखित करणे व सदर बिलाची नोंद रद्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,मालमत्ता कर वसुली वॉर्ड नं.२४ बिल नं.Z४२४१०८०३९ वर मे.वायरलेस टी.टी.इन्फो सर्व्हीसेस लि.या कंपनीचे मोबाईल टॉवरवर आकारणी केल्याची नोंद आहे.सदरील कंपनीने दिनांक २७/४/२०१५ रोजी इकडेस अर्ज देवून कळविले की,त्यांचे मोबाईल टॉवर काढलेले आहे.त्यामुळे सन २०१५-२०१६ पासुन कर आकारणी रद्द करावी.असे त्यांनी त्यांच्या अर्जात नमुद केले आहे.

अर्जदाराच्या अर्जानुसार समक्ष पहाणी करून त्यावर या अगोदर प्रस्ताव सादर केल होता.त्यावेळेस मा.उपायुक्त (कर) साहेबांनी सदर टॉवर कोठे स्थलांतरीत झालेले आहे.या बाबत माहिती घेवून प्रस्ताव सादर करणे बाबत आदेश दिला होता.त्यानुसार सदर टॉवरची नोंद नसले बाबत वसुली लिपीकांकडून लेखी माहिती घेतली.वास्तविक पहाता सदर कंपनीचे टॉवर अस्तित्वात नाही.त्यामुळे मोबाईल टॉवर अस्तित्वात नसतांना देखील मालमत्ता कर व इतर कराची थकबाकी अद्यापपर्यत चालू आहे.सन २०२१-२०२२ अखेर सदरील मोबाईल टॉवरची थकबाकी रू.१९२७८७७/- एवढी आहे.

सबब अर्जदाराचे अर्जानुसार वेळोवेळी समक्ष पहाणी अहवालानुसार सदर टॉवर अस्तित्वात नसल्याने मालमत्ता कर व इतर कराची थकबाकी रू.१९२७८७७/- + शास्ती सह वसुली न होणारी असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये सदरील रक्कम निर्लेखीत करणे व सदर बिलाची नोंद रद्द करणे बाबत मा.स्थायी समितीपुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे कर निरीक्षक व वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक करनिरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार अर्जदाराचे अर्जाप्रमाणे समक्ष पाहणी करून संबंधित मोबाईल टॉवर अस्तित्वात नसल्याने निदर्शनास आले.मालमत्ताकर व इतर कराची थकबाकी रू.१९२७८७७/- + शास्ती सह हि रक्कम वसुल न होणारी असल्याने "महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार" सदरील रक्कम निर्लेखीत करणे साठी व सदर बिलाची नोंद रद्द होणे बाबत मा.स्थायी समिती पुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संग्राहक यांचा अभिप्राय की,प्रभाग अधिकारी यांनी सादर केलेला प्रसताव महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण -८ कराधान नियम ५१ नुसार शास्ती अंशतः किंवा पुर्णता माफीचे अधिकार आहेत तसेच वसुल न होणारी रक्कम कलम १५२ नुसार निर्लेखीत करणेसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

प्रस्तावि "अ " "ब" "क" नुसार व मनपा अधि १९४९ मधील प्रकरण ४ कराधान नियम ५१ नुसार शास्ती अंशता किंवा पुर्णता माफीचे अधिकार आहेत तसेच वसुल न होणारी रक्कम कलम १५२ नुसार निर्लेखीत करणेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेबाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,सुनावणी ठेवावी.

समक्ष नाना गोसावी ,प्र.स.क्र.४ अधिकारी यांनी समक्ष चर्चा केली,फाईल ला फोटो जोडा व स्थळ पाहणी अहवाल जोडुन सादर करा.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,विनंती पुर्व अहवाल देणेत येतो की,सदर मिळकतीची समक्ष पाहणी केली असता मोबाईल टॉवर नसलेचे निदर्शनास आलेले आहे.त्याबाबत तसा फोटो सोबत जोडलेला आहे.सबब आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रमाणे मान्य.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सन २०१५ पासून कार्यवाही का केली नाही.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,मा.सादर ,सदरील वॉर्डला वसुली लिपीक नसल्याने सदरील प्रस्तावास कालावधी लागल्यामुळे उशिर झालेला आहे.तसेच सदरील वॉर्डचे काम बिगारी बघत आहेत.सबब आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "ब" मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती समोर सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मे.वायरलेस टी.टी.इन्फो सर्व्हिसेस लि, प्रभाग समिती क्र.४ ,वॉर्ड क्र.२४ बील नं.Z४२४१०८०३९ या बीलावर मोबाईल टॉवरची सन २०१५-२०१६ पासुन टॉवर काढल्याने मालमत्तेवर आकारण्यात आलेली रक्कम निर्लेखित करणे व सदर बिलाची नोंद रद्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सौ.मीना चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मे.वायरलेस टी.टी.इन्फो सर्व्हिसेस लि, प्रभाग समिती क्र.४ ,वॉर्ड क्र.२४ बील नं.Z४२४१०८०३९ या बीलावर मोबाईल टॉवरची सन २०१५-२०१६ पासुन टॉवर काढल्याने मालमत्तेवर आकारण्यात आलेली रक्कम निर्लेखित करणे व सदर बिलाची नोंद रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार मे.वायरलेस टी.टी.इन्फो सर्व्हिसेस लि, प्रभाग समिती क्र.४ ,वॉर्ड क्र.२४ बील नं.Z४२४१०८०३९ या बीलावर मोबाईल टॉवरची सन २०१५-२०१६ पासुन टॉवर काढल्याने मालमत्तेवर आकारण्यात आलेली रक्कम निर्लेखित करणे व सदर बिलाची नोंद रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.रूपाली वारे सही/-

अनुमोदक :- मा.सौ.मीना चव्हाण सही/-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

**विषय क्रमांक : ७१** **दिनांक :- २६/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.शासनाच्या राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे यांची कोविड १९ या कामाकरिता आयुष वैद्यकिय अधिकारी यांना राज्य आपत्ती व्यवस्थापन मधून काही कालावधीकरिता माहे नोव्हेंबर २०२१ ते ऑक्टोबर २०२२ अखेर काम करणे करिता कार्योत्तर नियुक्ती आदेश देणे व सदर कालावधीचे मानधन अदा करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभाग.

**संदर्भ :-** संचालक ,आयुष,आयुष संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई या कार्यालयाकडील जा.क्र.आसमु/कोविड१९/प्रार्दुर्भाव/उपाचार/बीएएमएस/बीएचएमएस/समान वेतन/२०२१ आयु-२दि.१६/०४/२०२१ चे प्राप्त पत्र.

उपरोक्त विषयानुसार फेरसादर करण्यात येतो की,मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी यांच्या निर्देशानुसार मुळ नेमणुकीबाबत कागदपत्रासहीत नस्ती सादर करण्यात आलेले असून त्यामध्ये आरसीएच कार्यक्रमाअंतर्गत नियुक्ती देण्यात आलेली आहे.परंतु आरसीएच कार्यक्रम बंद झाल्यामुळे वैदयकीय अधिकारी डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे यांना मा.शासनाच्या पत्रान्वये एनयुएचएम अंतर्गत अर्ध वेळ वैदयकीय अधिकारी या पदाकरीता एमबीबीएस शैक्षणिक पात्रता असल्यामुळे त्यांना एन यु एच एम कार्यक्रमाअंतर्गत घेता येणार नाही.

उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये त्यांना राज्य आपत्ती व्यवस्थापन मधून मानधन देयक अदा करावे लागेल.वैदयकीय अधिकारी डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे यांच्या मागणी पत्रानुसार कोविड १९ च्या काळात त्यांनी आरोग्य विभागात काम केलेले आहे.त्याकरिता मा.आयुक्त यांची मान्यता घेवून कोविड १९ या कामाकरिता आयुष वैदयकिय अधिकारी यांना राज्य आपत्ती व्यवस्थापन मधून मानधन देयक अदा करावे लागेल.वैदयकीय अधिकारी डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे यांच्या मागणी पत्रानुसार कोविड १९ च्या काळात त्यांनी आरोग्य विभागात काम केलेले आहे.त्याकरिता मा.आयुक्त यांची मान्यता घेवून कोविड १९ या कामाकरिता आयुष वैदयकीय अधिकारी यांना राज्य आपत्ती व्यवस्थापन मधून काही कालावधीकरिता माहे नोव्हेंबर २०२१ ते ऑक्टोबर २०२२ अखेर काम करणेकरिता कार्योत्तर नियुक्ती आदेश देणेकरीता व सदर कालावधीचे मानधन अदा करणेकरिता प्रस्ताव मंजुरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर लेखा व्यवस्थापक एनयुएचएम यांचा अहवाल असे.

यावर मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,दि.१६/४/२०२१ चे पत्र प्राप्त झाल्यानंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवालासह सादर करावे.

यावर सौ.रोहिणी संदिप नन्नवरे लोखापाल,एन टी ई पी यांचा अभिप्राय की,फेर सादर,वैदयकीय अधिकारी डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे यांची नियुक्ती दि.०५/११/२०२१ रोजी संपुष्टात आलेली होती.सन २०२१-२०२२ च्या मंजुर पी.आय.पी मध्ये शैक्षणिक अर्हता पात्र (एम.बी.बी.एस) असलेले ४ अर्थवेळ वैदयकिय अधिकारी भरलेले दाखवून उर्वरित ३ (डॉ.शिल्पा चेलवा डॉ.आरती डपसे व नंम्रता मकासरे (आहारतज्ञ) ) अर्धवेळ वैदयकीय अधिकारी शैक्षणिक अर्हता पात्र नसल्याने सदर पदे रिक्त दाखविण्यात आले आहे.तसेच मा.सहाय्यक संचालक राष्ट्रिय नागरी आरोग्य अभियान ,मुंबई यांचे जा.क्र.राआ सो/आरसीएच-२ /समायोजन /१३२०९५ -०९६/२०२२ दि.११/०२/२०२२ पत्राच्या अनुषंगाने आरसीएच कर्मचारी यांना मंजुर पदाच्या संख्येवर कार्यरत असल्यास त्यांची परिगणना राष्ट्रिय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत करण्यात येईल असे सुचित

करण्यात आले आहे.राष्ट्रिय नागरी अभियान अंतर्गत अर्धवेळ वैदयकीय अधिकारी यांची शैक्षणिक अर्हता एम.बी.बी.एस असल्याने सदर (डॉ.शिल्पा चेलवा,डॉ.आरती डापसे ) यांना राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान मध्ये वर्गकरता येत नाही.त्याअनुषंगाने डॉ.शिल्पा चेलवा ,डॉ.आरती डापसे यांना दिनांक ०५/११/२०२१ नंतर कोणत्याही प्रकारची पुर्ननियुक्ती देण्यात आलेली नाही व तत्कालीन आरोग्यअधिकारी यांनी सदर वैदयकीय अधिकारी यांना कोणत्याही प्रकारचे लेखी पुर्ननियुक्ती आदेश अथवा कार्यमुक्ती आदेश दिलेले नाही.परंतु तत्कालीन आरोग्य अधिकारी यांनी सदरचे वैदयकीय अधिकारी हे बीएएमएस असल्याने त्यांना आरसीएच अंतर्गत अथवा आस्थापना अंतर्गत कंत्राटी बीएएमएस वैदयकीय अधिकारी पदावर नियुक्ती आदेश देणेबाबत कारवाई करू असे अश्वासन त्यांना दिल्यामुळे सदरचे कर्मचारी आजपावेतो कार्यरत आहेत.

तथापी दि.२१/०४/२०२१ रोजी अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत राष्ट्रिय शहरी आरोग्य अभियानामध्ये अर्धवेळ वैदयकीय अधिकारी कार्यरत डॉक्टरांबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला होता.त्या प्रस्तावावर मुख्यलेखापरिक्षक यांनी वैदयकीय अधिक्षक यांचे शिफारसीनुसार मनपा दवाखान्यासाठी वैदयकीय अधिकारी यांची आवश्यकता व कामाची निकड पाहता वैदयकीय अधिक्षक यांचे शिफारसीनुसार आपल्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा असा शेरा मारून दि.२४/०५/२०२२ रोजी फाईल आरोग्य विभागास प्राप्त झाली आहे.त्यांनतर सदरची फाईल आपल्या निदर्शनास आणून आपल्या मार्गदर्शनानुसार सदरचे वैदयकीय अधिकारी यांना कोविड १९ अंतर्गत आयुष वैदयकीय अधिकारी यामधून नियुक्ती आदेश व मानधन देण्याची कार्यवाही सुरू आहे तरी आपल्या माहितीस सादर.

यावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,(१) "अ" बाबत संबधितास कारणे दाखवा नोटीस देणे उचित राहिल.(२) "ब" बाबत लेखापाल यांनी सादर केलेले मा.शासनाचे मार्गदर्शन विचारात घेता सदरचे कर्मचारी यांना आर.सी.एच.प्रकल्प संपुष्टात आल्याने व त्यांची परिगणना एच यु एल एम मंजुर पदाच्या संख्येत व निकषात न बसल्याचे कळविणे उचित वाटते.(३) कोविड अंतर्गत आजपावेतो केलेल्या कामाचा मोबदला SDRF निधी अंतर्गत केलेस हरकत नसावी.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,चर्चा करा.चर्चा केली.डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे यांचे शिक्षण बी.ए.एम.एस.असल्याने NUHM मधील वैदयकीय अधिकारी (पुर्ण वेळ) या साठी पात्र ठरत नसल्यामुळे त्यांचे नोव्हेंबर २०२१ पासुन अदा करण्यात आले नाही.सध्या डॉ.शिल्पा चेलवा,सावेडी आरोग्य केंद्रावर व डॉ.आरती डापसे ,तोफखाना आरोग्य केंद्रावर कार्यरत आहे.तसेच दोन्ही वैदयकीय अधिकारी यांचे काम समाधान कारक आहे.महानगरपालिके मधिल वैदयकीय अधिकारी यांचे पदे रिक्त असल्यामुळे वैदयकीय अधिकारी यांची पहिली नियुक्ती RCH मध्ये झाली परंतु RCH बंद झाल्यामुळे NUHM मध्ये नियुक्ती देण्यात आली.शैक्षणिक पात्रते मुळे NUHM अंतर्गत वेतन अदा करण्यास व अर्थ वेळ वैदयकीय अधिकारी म्हणून नेमुणुक देता येणार नाही.असे कळविले आहे.त्यामुळे सदर वैदयकीय अधिकारी यांचे नोव्हेंबर २०२१ पासुन वेतन अदा करावयाची झाल्यास सदर वैदयकीय अधिकारी यांना मानधनावर नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थाय समिती कडे पाठविणे उचित तथापी पुढील निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.शासनाच्या राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे यांची कोविड १९ या कामाकरिता आयुष वैद्यकिय अधिकारी यांना राज्य आपत्ती व्यवस्थापन मधून काही कालावधीकरिता माहे नोव्हेंबर २०२१ ते ऑक्टोबर २०२२ अखेर काम

करणे करिता कार्योत्तर नियुक्ती आदेश देणे व सदर कालावधीचे मानधन अदा करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्या नुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.मुदस्सर शेख:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे वैदयकीय अधिकारी नियुक्ती आदेश देणे बाबत कार्यवाही करू असे अश्वासन तत्कालीन वैदयकीय आरोग्य अधिकारी यांनी दिल्यामुळे सदरचे कर्मचारी आज पावेतो कार्यरत आहेत. दोन्ही वैदयकीय अधिकारी राष्ट्रीय नागरी अभियांन या अंतर्गत महानगरपालकेच्या नागरी आरोग्य केंद्रमध्ये कार्यरत होत्या.परंतु राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामध्ये तांत्रीकअडचणी असल्यामुळे त्यांना दि.०९/११/२०२१ पासुन मानधन अदा केले नाही. परंतु त्याआज पर्यत कार्यरत आहेत. या कामकेलेल्या कालावधीतील मानधन हे अहमदनगर महानगरपालिकेतील वैद्यकिय अधिकारी यापदी मानधनावर कार्यरत असलेल्या वैदयकीय अधिकारी यांच्या समतुल्य दरमहा मानधन रक्कम रूपये २८,०००/- प्रमाणे अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे वैदयकीय अधिकारी यांचे काम समाधान कारक आहे.महानगरपालिके मधिल वैदयकीय अधिकारी यांचे पदे रिक्त असल्यामुळे या दोन्ही वैद्यकीय अधिकारी दि.०९/११/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर वैद्यकीय अधिकारी या पदी नियुक्तीस मंजुरी देण्यात येत आहे. या बाबतची नियुक्ती व मानधन देयकाबाबतचे कार्यालयीन सोपस्कर आस्थापना विभागामार्फत पार पाडण्यात यावेत.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे वैदयकीय अधिकारी नियुक्ती आदेश देणे बाबत कार्यवाही करू असे अश्वासन तत्कालीन वैदयकीय आरोग्य अधिकारी यांनी दिल्यामुळे सदरचे कर्मचारी आज पावेतो कार्यरत आहेत. दोन्ही वैदयकीय अधिकारी राष्ट्रीय नागरी अभियांन या अंतर्गत महानगरपालकेच्या नागरी आरोग्य केंद्रमध्ये कार्यरत होत्या.परंतु राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामध्ये तांत्रीक अडचणी असल्यामुळे त्यांना दि.०९/११/२०२१ पासुन मानधन अदा केले नाही. परंतु त्याआज पर्यत कार्यरत आहेत. या कामकेलेल्या कालावधीतील मानधन हे अहमदनगर महानगरपालिकेतील वैद्यकिय अधिकारी यापदी मानधनावर कार्यरत असलेल्या वैदयकीय अधिकारी यांच्या समतुल्य दरमहा मानधन रक्कम रूपये २८,०००/- प्रमाणे अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

डॉ.शिल्पा चेलवा व डॉ.आरती डापसे वैदयकीय अधिकारी यांचे काम समाधान कारक आहे.महानगरपालिके मधिल वैदयकीय अधिकारी यांचे पदे रिक्त असल्यामुळे या दोन्ही वैद्यकीय अधिकारी दि.०९/११/२०२१ पासुन पुढील सहा महिन्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर वैद्यकीय अधिकारी या पदी नियुक्तीस मंजुरी देण्यात येत आहे.

या बाबतची नियुक्ती व मानधन देयकाबाबतचे कार्यालयीन सोपस्कर आस्थापना विभागामार्फत पार पाडण्यात यावेत.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख

अनुमोदक :- मा.श्री.सचिन शिंदे

ठराव सर्वानुमते मंजुर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०६**

---

**विषय क्रमांक : ७२** **दिनांक :- २६/०७/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१ -२०२२ ई - निविदा क्र.७९६४५६ या निविदेअंतर्गत प्रभाग क्रमांक ७ मधील साळवेनगर अंतर्गत ड्रेनेजलाईन व कॉंक्रीटीकरण करणे या कामाची निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयाबाबत खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१.प्रशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी अ.नगर दि.२८/०३/२०२२

२.ई - निविदा क्रमांक ७९६४५६/सन २०२२-२३ दि.०९/०५/२०२२

३.निविदा विक्री कालावधी :दि.०९/०५/२०२२ ते ०२/०६/२०२२

४.निविदा स्विकारणेची दिनांक : दि.०९/०५/२०२२ ते दि.०२/०६/२०२२

५.निविदा उघणेचा दिनांक :दि.०६/०६/२०२२

६.कामाची मुदत :०६ महिने

७.प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल : दि.३०/०६/२०२२ रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७९६४५६ | प्रभाग क्रमांक ७ मधील साळवेनगर अंतर्गत ड्रेनेजलाईन व कॉंक्रीटीकरण करणे | ५३,७३,०५९/- | ओमसाई कंन्सट्रक्शन ,अ.नगर | निविदा दराने | ओमसाई कंन्स्ट्रक्शन अ.नगर<br>निविदा दराने |
| | | | मे.एस.एफ.शेख कंन्स्ट्र.अ.नगर | निविदा दरापेक्षा १०.००% जादा दराने | |

वरिल रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक ओमसाई कंन्स्ट्रक्शन,अ.नगर यांनी सदरची निविदा निविदा दराने आलेली आहे.सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.

तरी ओमसाई कंन्स्ट्रक्शन,अ.नगर यांचे निविदा दराने आलेल्या दरास मंजूरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "ब" प्रमाणे निविदा दराची निविदा निर्णयार्थ मा.स्थायी समितीसमोर सादर करणेस आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ७३ (क) नुसार कार्यवाही करून प्रस्तावीत केले नुसार निविदाकार यांची निविदा पुढील निर्णयास्तव सादर.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "ब" प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "ब" ,शहर अभियांता,मुलेप,मुलेअ,सहा.आयुक्त यांची अभिप्रायानुसार निविदा दराने मान्यतेस्तव निर्णयासाठी मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,यथाप्रस्तावित "अ"

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१ - २०२२ ई - निविदा क्र.७९६४५६ या निविदेअंतर्गत प्रभाग क्रमांक ७ मधील साळवेनगर अंतर्गत ड्रेनेजलाईन व कॉक्रीटीकरण करणे या कामाची निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१ - २०२२ ई - निविदा क्र.७९६४५६ या निविदेअंतर्गत प्रभाग क्रमांक ७ मधील साळवेनगर अंतर्गत ड्रेनेजलाईन व कॉक्रीटीकरण करणे या कामाचे निविदाधारक ओमसाई कंन्स्ट्रक्शन,अ.नगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१ -२०२२ ई - निविदा क्र.७९६४५६ या निविदेअंतर्गत प्रभाग क्रमांक ७ मधील साळवेनगर अंतर्गत ड्रेनेजलाईन व कॉक्रीटीकरण करणे या कामाचे निविदाधारक ओमसाई कंन्स्ट्रक्शन,अ.नगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र बारस्कर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका